दैनिक
https://samarthrajyog.com/
E-Mail : dainiksamarthrajyogbeed@gmail.com
# समर्थ राजयोग
SAMARTH RAJYOG
वैभव विवेक स्वामी
संपादक
राजमान्य, राजशक्ती
No.LSB / Beed / RNP - 200 / 2024 - 2026.
बीडसह छत्रपती संभाजीनगर, जालना, परभणी, हिंगोली, नांदेड, लातूर, धाराशिव या जिल्ह्यातून एकाच वेळी प्रकाशित होणारे एकमेव मराठवाडा स्तरीय विभागीय दैनिक...
बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी | वर्ष - ६ वे | अंक -३२ | बुधवार, दि.०८ ऑक्टोबर २०२५ | 98 22 62 85 21 | आरएनआय -एमएएचएमएआर/२०२०/७९८०१ | किंमत ३ रु | पाने ४
Beed | Daily Marathi | Year-6th | Issue-32 | Wednesday, Dt.08 October 2025 | 98 22 62 85 21 | RNI - MAHMAR/2020/79801 | Price 3 Rs. | Pages 4

# नुकसानग्रस्त शेतकऱ्यांच्या मदतीसाठी ३१,६२८ कोटींचे पॅकेज - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

## देशात इतर राज्यांच्या तुलनेत आतापर्यंतची सर्वात मोठी आर्थिक मदत

मुंबई /प्रतिनिधी

राज्यात यावर्षी झालेल्या अतिवृष्टीमुळे शेतीचे मोठे नुकसान झाले. यामध्ये २९ जिल्हे प्रभावित झाले आहेत. या जिल्ह्यांतील नुकसानग्रस्त २५३ तालुके आणि २०५९ मंडळांमध्ये मदतीसाठी ६५ मिलीमिटर पावसाची अट न ठेवता शेतकऱ्यांना सरसकट नुकसान भरपाई देण्यात येणार असल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली. नुकसानग्रस्त भागातील बळीराजाला पुन्हा उभे करण्यासाठी ३१ हजार ६२८ कोटींच्या मदतीचे पॅकेज मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज जाहीर केले.

या पॅकेजनुसार कोरडवाहू शेतीसाठी प्रति हेक्टरी १८ हजार ५०० रुपये, हंगामी बागायतीसाठी २७ हजार रुपये तर बागायतीसाठी प्रति हेक्टरी ३२ हजार ५०० रुपये मदत दिली जाणार आहे. जाहीर करण्यात आलेली मदत दिवाळीपूर्वी देण्याचा प्रयत्न राहणार असून ही आतापर्यंतची सर्वात मोठी आर्थिक मदत असल्याचेही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी सांगितले.

मंत्रिमंडळाच्या बैठकीनंतर मंत्रालयात आयोजित पत्रकार परिषदेत मुख्यमंत्री फडणवीस यांनी शेतकऱ्यांसाठी देऊ केलेल्या मदतीची माहिती दिली. यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, कृषी मंत्री



दत्तात्रय भरणे, जलसंपदा मंत्री गिरीश महाजन, इतर मागास बहुजन कल्याण मंत्री अतुल सावे, मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद जाधव पाटील, परिवहन मंत्री प्रताप सरनाईक, सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंह भोसले, मुख्य सचिव राजेशकुमार, वित्त विभागाचे अपर मुख्य सचिव ओ.पी.गुप्ता, कृषी विभागाचे अपर मुख्य सचिव विकासचंद्र रस्तोगी, मदत व पुनर्वसन विभागाच्या प्रधान सचिव विनिता वेद-सिंगल आदी उपस्थित होते. यावेळी मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, अतिवृष्टीमुळे शेती आणि शेतकऱ्यांसह पिके, जनावरे, गोठे, दुकाने, ग्रामीण भागातील पायाभूत सुविधा यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. काही जणांचे मृत्यूही झाले आहेत. मंत्रिमंडळातील सदस्यांनी काही ठिकाणी प्रत्यक्ष पाहणी करुन नुकसानग्रस्तांना तातडीची १० हजार रुपयांची मदत, गहू, तांदूळ आदी देण्यात आले. यासाठी २२०० कोटी रुपयांचा पहिला हप्ता तातडीने मंजूर करण्यात आला. विमाधारक शेतकऱ्यांना लवकर मदत मिळवून देण्यासाठी केंद्रीय कृषी मंत्री शिवराजसिंह चौहान स्वत: प्रयत्न करीत असून विमाधारकांव्यतिरिक्त इतर शेतकऱ्यांनाही १७ हजार रुपये प्रति हेक्टरी इतकी रक्कम दिली जाणार आहे. या भरपाईसाठी १८ हजार कोटींहून अधिकची तरतूद केली जाणार असल्याची माहितीही त्यांनी दिली.

(उर्वरीत पान २ वर)



## राजीव गांधी चौक व कॅनॉल रोडवर ट्रॅफिक पोलिसांची व्यापक मोहीम

### वाहतुकीला अडथळा करणाऱ्या विक्रेत्याविरुध कारवाई

बीड (प्रतिनिधी):

शहरातील राजीव गांधी चौक, कॅनॉल रोडवर रस्त्यावर भाजी विक्रेत्यामुळे रहदारीला मोठा अडथळा निर्माण होत होता. यासंदर्भात नागरिकांच्या तक्रारी वाढल्या होत्या. याबाबत वाहतूक शाखेच्या पोलिसांनी दखल घेऊन मंगळवारी कारवाई करून राजीव गांधी चौकातील व कॅनॉल रोड अतिक्रमण हटविले. ट्रॅफिक पोलिसांनी केलेल्या या कारवाईमुळे अनेकांनी समाधान व्यक्त केले आहे.

यासंदर्भात माहिती अशी की,

(उर्वरीत पान २ वर)

## पुरग्रस्तांच्या नावाखाली आलेल्या मदतीवर दुसऱ्यांनीच डल्ला मारला

### मदतीच्या आडून प्रशासकीय अधिकाऱ्यांच्या समक्ष शिरुरमध्ये गरिबांची थट्टा !

शिरूर कासार /प्रतिनिधी

अतिवृष्टीमध्ये सिंदफणा नदीच्या महापूचे पाणी घरात शिरल्याने संसारपयोगी साहित्यासह अन्नधान्य वाहून गेले. मध्यरात्री अचानक आलेल्या महापूराने घरातील साहित्य सावरण्याचीही संधी दिली नाही. त्यामुळे अंगच्या कपड्याने जीव वाचवण्याच्या अंकताने घराबाहेर पडलेल्या शिरुर शहरातील पूरग्रस्तांच्या मदतीसाठी आज एका जिल्हा बाहेरील सेवाभावी संस्थेने किराणा किट, दप्तर यासह गरजु साहित्य वाटपाचे आयोजन करण्यात आले होते. मात्र खऱ्या गरजूवंतांना बाजूला ठेवून उपस्थितांनीच आलेल्या मदतीवर डल्ला मारला. विशेष बाब म्हणजे प्रशासकीय अधिकाऱ्यांच्या देखत हा प्रकार घडल्याने अशा भुरट्यांवर कोण कारवाई करणार ?असा प्रश्न निर्माण झाला आहे.

प्रशासकिय अधिकार्यांच्या उपस्थितीत मोठ्या दिमाखात कार्यक्रमाचे सुरू झाला, स्टेज संवाद पोरख्यांनी थेट राज्यातील अतिवृष्टींवर मोठ-मोठ्या वल्गना केल्या. सर्वांचे मनोगत व्यक्त झाल्यानंतर किट वाटपाचा कार्यक्रम घेण्यात आला. यामध्ये कार्यक्रमासाठी उपस्थित ज्यांचा महापूराशी केवळ नेत्रदृष्टी पुरता संबंध असावा त्यांनीच अगोदर किटांवर डल्ला मारला. आयोजकांकडे प्रशासनकडील बाधीत, गरीब-गरजू, पूरग्रस्तांची यादी सोबत असतानाही उपस्थितांनीच साहित्यांच्या किटवर डल्ला मारला तोही उपस्थित प्रशासकिय अधिकार्यांसमोर. दरम्यान शहरातील जुन्या बाजारतळातील १७ कुटूंबीयांसह तालुक्यातील शेकडो पूरग्रस्तांचा यादीत समावेश असताना सेवा-भावीच्या आयोजकांनी जानिवपूर्वक मर्जीतल्या लोकांनाच कार्यक्रमाचे आमंत्रण दिले. ज्यामुळे गरिब गरजू पूरग्रस्तांच्या नावाखाली कार्यक्रमास उपस्थित राहिलेल्या हितचिंतकांना मलिद्यावर सहज डल्ला मारता यावा हा ढोबळ उद्देश

(उर्वरीत पान २ वर)



## केज येथील सहदुय्यम निबंधक कार्यालय बनले दलालाचा अड्डा

केज/प्रतिनिधी

केज शहरातील सहदुय्यम कार्यालयात दलालांचा सुळसुळाट झाला असुन दस्त नोंदणीसाठी गोरगरीब जनतेला लुबाडणाऱ्यांचा सपाटा चालु असुन गोरगरीब जनतेला लुबाडणाऱ्या दलालांचा व संबंधित कर्मचारी यांचा बंदोबस्त करुन सर्व सामान्य जनतेला न्याय मिळावा अशी मागणी पक्षकारांकडुन केली जात आहे.

शेत जमिनी अथवा घर जागा खरेदी विक्री करण्यासाठी शासनाने निर्धारित केलेले मुल्यांकन भरुन शासन नियमानुसार

(उर्वरीत पान २ वर)

# # बॉटम न्युज

## वाळू चोरीचे गुन्ह्यातून दोन आरोपींची निर्दोष मुक्तता

बीड /प्रतिनिधी

वाळू चोरीच्या गुन्ह्यातून सबळ पुराव्या अभावी दोन आरोपींची निर्दोष मुक्तता करण्यात आली. आरोपींची बाजू ड. राजेश जाधव यांनी प्रभावीपणे मांडली त्यांची बाजू कोर्टाने ग्राह्य धरून आरोपींची निर्दोष मुक्तता केली.



फिर्यादी संजय सूर्यकांतराव इंगोले मंडळ अधिकारी तहसील कार्यालय बीड यांनी दिनांक ०७/०७/२०२१ रोजी पोलीस स्टेशन पेठ बीड येथे इम्रान पठाण मोहहमद पठाण व शेख जमील शेख छोटू मिया यांचे विरुद्ध दिनांक २६/०६/२०२१ रोजी खंडेश्वरी रोडवर वाहन क्रमांक एम.एच०५बी.डी ८८९९ विना परवानाअवैध वाळू वाहतूक करीत असले बाबत आरोपी विरुद्ध कलम ३७९,३४ भा.द.वि व कलम ४८,४८(१)(२) महाराष्ट्र जमीन

(उर्वरीत पान २ वर)

### पंच परिवर्तनातून भारत विश्वगुरु होईल - अँड.आशिष जाधवर

## राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचा शस्त्रपूजन व विजयादशमी उत्सव ; ऐतिहासिक पथसंचलन









अंबाजोगाई / सुनील शिरसाट

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या शताब्दी वर्षांनिमित्त आयोजित शस्त्रपूजन व विजयादशमी उत्सव रविवारी श्री शंकर महाराज वंजारी वसतीगृह मैदानावर अत्यंत शिस्तबद्ध, लयबद्ध आणि उत्साहात संपन्न झाला. या निमित्ताने शहरातून काढण्यात आलेल्या भव्य पथसंचलनाने अंबाजोगाई शहरात नवचैतन्य निर्माण केले.

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या वतीने विजयादशमीच्या पावन पर्वानिमित्त रविवार, दिनांक ५ ऑक्टोबर रोजी दिमाखदार पथसंचलनाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमस्थळी रविवारी सकाळपासूनच स्वयंसेवकांची लगबग सुरू होती. सायं. ४.४५ वाजता सर्वजण एकत्र जमल्यानंतर, शाखा

(उर्वरीत पान २ वर)

## सरकारला वठणीवर आणण्यासाठी संभाजीनगर येथील हंबरडा मोर्चास

## बीड जिल्हातील शेतकरी व शिवसैनिकांनी ताकदीने सहभागी व्हावे - अंबादास दानवे



बीड /प्रतिनिधी

पक्षप्रमुख उद्धवसाहेब ठाकरे यांच्या आदेशानुसार शिवसेना नेते तथा विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी बीड जिल्हातील सहाही विधानसभा क्षेत्रातील शिवसेना पदाधिकारी व शिवसैनिक यांची अढावा बैठक बीड शहरातील हॉटेल नीलकमल येथे घेतली व पक्षप्रमुख उद्धवसाहेब ठाकरे यांच्या नेतृत्वात येणाऱ्या ११/१०/२०२५ रोजी संभाजीनगर येथील आयुक्तालयावर शेतकऱ्यांच्या विविध मागण्यासाठी होणाऱ्या हंबरडा मोर्चा संदर्भात सर्व पदाधिकारी यांचे मत जाणून घेतली.

या जिल्हास्तरीय बैठकीमध्ये शिवसेना नेते तथा विरोधी पक्षनेते अंबादास दानवे मार्गदर्शन करताना म्हणाले की,गेल्या विधानसभा निवडणुकीत या सरकराने सांगितले होते की, आम्ही शेतकऱ्यांना सरसकट कर्जमाफी जाहीर करु ,पण तीन्ही अधिवेशनात या सरकराने कुठलाही निर्णय घेतला नाही, राज्यातील शेतकरी सततचा दुष्काळ, गारपीट, अतिवृष्टी ,महागडी खते , यामुळे आर्थिक संकटात सापडला आहे, अनेकांना थकबाकी, जप्तीच्या नोटिसा, यामुळे शेतकरी आत्महत्याचे पाऊल उचलत आहे.या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांना पुन्हा उभारी देण्यासाठी तातडीची सरसकट कर्जमाफी हिच परिणामकारक उपाययोजना आहे.या सर्व मागण्या मंजूर करून घेण्यासाठी मा. पक्षप्रमुख उद्धवसाहेब ठाकरे यांच्या नेतृत्वाखाली व सर्व शिवसेना नेते, उपनेते, संपर्कप्रमुख, सहसंपर्कप्रमुख, सर्व जिल्हाप्रमुख यांच्या उपस्थितीत संभाजीनगर येथील आयुक्तालयावर मोठ्या संख्येने सहभागी व्हावे असे आवाहन त्यांनी केले.

यावेळी संपर्कप्रमुख परशुरामजी जाधव

(उर्वरीत पान २ वर)

शुद्ध सोने ! अप्रतिम कलाकुसर !! विश्वासाची परंपरा !!!
प्रमाणित सुवर्ण अलंकाराचे AC दालन
दहिवाळ सुवर्णकार
नवीन पत्ता : डी.पी.रोड, सहयोगनगर, सारडा नगरी जवळ, बीड
☎: 0230377, मो. 8432771777
शाखा : माळीवेस, बीड
☎: 0220377, मो. 9405072777

# मी नगराध्यक्ष झालो असतो तर इतिहास घडविला असता- खुर्शीद आलम



तरीपण नियतीने दिलेले उमेदवाराचे स्वागत आहे-*
बीड (प्रतिनिधी) गेल्या चार वर्षांपासून विविध कारणांमुळे अडकलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांचे निवडणूक मा.सर्वोच्च न्यायालयाच्या दणक्यामुळे निवडणूक आयोगाने निवडणुकीची तयारी सुरू केली आहे, मी गेल्या पंचवीस वर्षांपासून राजकारणाच्या माध्यमातून कुठलेही भ्रष्टाचार न करत संपूर्ण इमानदारीने समाजसेवा करीत आहेत, राष्ट्रवादीच्या स्थापनेपासून ते आजपर्यंत एकच पक्षात आहेत, अनेक ऑफरला लाथ मारल्या, अमरतजलचे ११४ कोटींचा घोटाळा बाहेर काढून गुत्तेदाराला मेनेज झालो नाही तर त्यांच्याकडून शहरातील पाइपलाइनचे कामे करून घेतली, आजपर्यंत जयदत्त अण्णा क्षीरसागर, भारतभूषण क्षीरसागर आ.संदिप भैय्या क्षीरसागर यांच्या नेतृत्वात करत आलोय नेत्यांकडून कधीच व्यक्तीक लाभ घेतलेला नाही, क्षीरसागराच्या माध्यमातून सर्वसामान्यांची सेवा करत दोन वेळेस नगरसेवक झालो एकवेळ अपक्ष ही निवडून आलो. स्वच्छता सभापती असतांना इमानदारीने शहर स्वच्छतेसाठी जीव तोडून प्रयत्न केल्यामुळे बीड शहराला स्वच्छतेचा अवार्ड मिळाला. भ्रष्टाचारविरोधात आणि शहराच्या विकासासाठी स्वतःच्याच नेतेच्या विरोधात लढलो, रेल्वेसाठी आंदोलने केले जेलात गेलो. शहरातील नागरिकांच्या हितार्थ अनेक आंदोलने केले, बीड शहरातील नागरिकांच्या सुविधेचे बार्शी नाका रेल्वे स्टेशन खा. बजरंग बप्पा सोनवणे यांच्या माध्यमातून मंजूर करून घेतले, सध्या पावसाळ्यामुळे मोमीनपुरा.बालेपिर. नर्सरी रोड नाला परिसरातील लोकांना गाजावाजा न करता अनेक लाभ मिळवून दिले गिनले तर अनेक कामे केलेले आहेत,

## गणिताच्या उत्क्रांतीचा प्रवास व करिअरच्या संधी या विषयावर डॉ. सातपुते यांचे व्याख्यान संपन्न

बीड /प्रतिनिधी
सौ.के.एस.के.महाविद्याय बीड येथील गणित विभागामार्फत इव्होल्युशन ऑफ मॅथेमॅटिक्स अँड इट्स करिअर या विषयावर वैद्यनाथ महाविद्यालय परळी येथील गणित विभाग प्रमुख डॉ. बी. एस. सातपुते यांच्या व्याख्यानाचे आयोजन दिनांक ७ ऑक्टोबर रोजी करण्यात आले. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिवानंद क्षीरसागर यांनी भूषविले.

आपल्या व्याख्यानात डॉ. सातपुते यांनी गणिताच्या उत्क्रांतीचा इतिहास अतिशय सोप्या भाषेत मांडला. अध्यक्षीय समारोपात डॉ. शिवानंद क्षीरसागर यांनी गणित हा विषय जीवनामध्ये किती महत्त्वाचा आहे यावर प्रकाश टाकला.याप्रसंगी व्यासपीठावर महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. संजय पाटील देवळाणकर, उपप्राचार्य डॉ. अनिता शिंदे कनिष्ठ महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. नारायण काकडे, पर्यवेक्षक श्री. जालिंदर कोळेकर हे उपस्थित होते.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व प्रस्ताविक गणित विभाग प्रमुख डॉ. शंकर राऊत यांनी केले व आभार प्रदर्शन डॉ. पद्माकर ससाने यांनी मानले. या व्याख्यानाचा लाभ एम. एससी व बी.एससी च्या बहुसंख्य विद्यार्थ्यांनी घेतला.



## यशवंतराव चव्हाण तंत्रनिकेतन बीड येथे पालक मेळावा संपन्न

बीड /प्रतिनिधी
७-१०-२०२५ रोजी म.शि.प्र संचालित,यशवंतराव चव्हाण तंत्रनिकेतन, बीड येथे राबवत असलेल्या मेंटोर मेंट्टी उपक्रमाच्या अंतर्गत तिन्ही वर्षातील विद्यार्थ्यांसाठी पालक मेळावा आयोजित करण्यात आला होता. यावेळी प्राचार्य डॉ. बापुराव गहिनीनाथराव मरलापल्ले यांनी विद्यार्थ्यांना सखोल मार्गदर्शन केले. मेळावा आयोजित करण्यासाठी संस्थेचे अध्यक्ष प्रकाश (दादा) सोळंके, उपाध्यक्ष अमरसिंह (भैय्यासाहेब) पंडित, सचिव सतिश (भाऊ) चव्हाण, प्राचार्य.डॉ.बापूराव मरलापल्ले यांचे मार्गदर्शन लाभले.

यावेळी शैक्षणिक समन्वयक प्रा.केंद्रे बी.ए, प्रा.गायकवाड एस.एस, प्रा. जगताप एम. यू यांनी कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी परिश्रम घेतले. तसेच महाविद्यालयामधील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.


## जाहिर प्रगटन

**तहसीलदार,बीड यांचे न्यायालयात**
**जन्म नोंद दावा प्रकरण अर्ज नं.४०९/२०२५**

**मोहम्मद हुसेन चांदसाब कुरेशी** विरूध्द **ग्रामपंचायत कार्यालय, नेकनुर**
पहा
**१. मोहम्मद हुसेन चांदसाब कुरेशी**
**रा.नेकनुर ता.जि.बीड**

उपरोक्त प्रमाणे जन्म मृत्यू नोंद दावा प्रकरण विधीज्ञामार्फत या कार्यालयास प्राप्त झाले असुन जन्म धारक **कुरेशी तहरीम आरा मुहम्मद हुसैन** यांचा **दिनांक ०५.०२.१९८८** रोजी जन्म झालेला असुन त्यांचे जन्म नोंद जन्म मृत्यू नोंदवहीमध्ये घेणे बाबतच्या मागणीच्या अनुषंगाने या कार्यालयात सुनावणी सुरू आहे.

सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहु अर्जदार यास जन्माची नोंद **ग्रामपंचायत कार्यालय न.प.कार्यालयास नेकनुर ता.बीड** येथील जन्म मृत्यू रजिस्टरला घेवून जन्म प्रमाणपत्र देण्याबाबत कोणाची हरकत असेल तर ह्या जाहिरनाम्याच्या तारखेपासून एक महिन्याच्या आत त्यांनी या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि ह्या लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य पुरावा घेवून त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहु जन्म नोंद **ग्रामपंचायत कार्यालय मौजे नेकनुर ता.जि.बीड** येथील जन्म मृत्यू रजिस्टरला घेवून जन्म प्रमाणपत्र देण्याबाबत आदेशित केले जाईल याची नोंद घ्यावी.

आज दि.२२.०९.२०२५ रोजी माझ्या सही व शिक्क्यानिशी दिले.

सदर प्रकरणात पुढील तारिख २२.१०.२०२५ ही आहे

**स्वाक्षरित/-**
**तहसीलदार,बीड**

## जाहिर प्रगटन

**तहसीलदार,बीड यांचे न्यायालयात**
**जन्म नोंद दावा प्रकरण अर्ज नं.४१०/२०२५**

**मोहम्मद हुसेन चांदसाब कुरेशी** विरूध्द **ग्रामपंचायत कार्यालय, नेकनुर**
पहा
**१. मोहम्मद हुसेन चांदसाब कुरेशी**
**रा.नेकनुर ता.जि.बीड**

उपरोक्त प्रमाणे जन्म मृत्यू नोंद दावा प्रकरण विधीज्ञामार्फत या कार्यालयास प्राप्त झाले असुन जन्म धारक **कुरेशी तहेसीन आरा मुहम्मद हुसैन** यांचा **दिनांक १०.०७.१९८६** रोजी जन्म झालेला असुन त्यांचे जन्म नोंद जन्म मृत्यू नोंदवहीमध्ये घेणे बाबतच्या मागणीच्या अनुषंगाने या कार्यालयात सुनावणी सुरू आहे.

सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहु अर्जदार यास जन्माची नोंद **ग्रामपंचायत कार्यालय न.प.कार्यालयास नेकनुर ता.बीड** येथील जन्म मृत्यू रजिस्टरला घेवून जन्म प्रमाणपत्र देण्याबाबत कोणाची हरकत असेल तर ह्या जाहिरनाम्याच्या तारखेपासून एक महिन्याच्या आत त्यांनी या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि ह्या लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य पुरावा घेवून त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहु जन्म नोंद **ग्रामपंचायत कार्यालय मौजे नेकनुर ता.जि.बीड** येथील जन्म मृत्यू रजिस्टरला घेवून जन्म प्रमाणपत्र देण्याबाबत आदेशित केले जाईल याची नोंद घ्यावी.

आज दि.२२.०९.२०२५ रोजी माझ्या सही व शिक्क्यानिशी दिले.

सदर प्रकरणात पुढील तारिख २२.१०.२०२५ ही आहे

**स्वाक्षरित/-**
**तहसीलदार,बीड**

## जाहिर प्रगटन

**तहसीलदार,बीड यांचे न्यायालयात**
**जन्म नोंद दावा प्रकरण अर्ज नं.४१२/२०२५**

**कुरेशी मुनाल महंमद हुसेन** विरूध्द **ग्रामपंचायत कार्यालय, नेकनुर**
पहा
**१. कुरेशी मुनाल महंमद हुसेन**
**रा.नेकनुर ता.जि.बीड**

उपरोक्त प्रमाणे जन्म मृत्यू नोंद दावा प्रकरण विधीज्ञामार्फत या कार्यालयास प्राप्त झाले असुन जन्म धारक **कुरेशी मुनाफ महंमद हुसेन** यांचा **दिनांक २५.०६.१९९१** रोजी जन्म झालेला असुन त्यांचे जन्म नोंद जन्म मृत्यू नोंदवहीमध्ये घेणे बाबतच्या मागणीच्या अनुषंगाने या कार्यालयात सुनावणी सुरू आहे.

सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहु अर्जदार यास जन्माची नोंद **ग्रामपंचायत कार्यालय न.प.कार्यालयास नेकनुर ता.बीड** येथील जन्म मृत्यू रजिस्टरला घेवून जन्म प्रमाणपत्र देण्याबाबत कोणाची हरकत असेल तर ह्या जाहिरनाम्याच्या तारखेपासून एक महिन्याच्या आत त्यांनी या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि ह्या लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य पुरावा घेवून त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहु जन्म नोंद **ग्रामपंचायत कार्यालय मौजे नेकनुर ता.जि.बीड** येथील जन्म मृत्यू रजिस्टरला घेवून जन्म प्रमाणपत्र देण्याबाबत आदेशित केले जाईल याची नोंद घ्यावी.

आज दि.२२.०९.२०२५ रोजी माझ्या सही व शिक्क्यानिशी दिले.

सदर प्रकरणात पुढील तारिख २२.१०.२०२५ ही आहे

**स्वाक्षरित/-**
**तहसीलदार,बीड**

## जाहिर प्रगटन

**तहसीलदार,बीड यांचे न्यायालयात**
**जन्म नोंद दावा प्रकरण अर्ज नं.४१३/२०२५**

**कुरेशी जाहेद खालेद** विरूध्द **ग्रामपंचायत कार्यालय, नेकनुर**
पहा
**१. कुरेशी जाहेद खालेद**
**रा.नेकनुर ता.जि.बीड**

उपरोक्त प्रमाणे जन्म मृत्यू नोंद दावा प्रकरण विधीज्ञामार्फत या कार्यालयास प्राप्त झाले असुन जन्म धारक **कुरेशी जाहेद खालेद** यांचा **दिनांक ०७.०७.१९८२** रोजी जन्म झालेला असुन त्यांचे जन्म नोंद जन्म मृत्यू नोंदवहीमध्ये घेणे बाबतच्या मागणीच्या अनुषंगाने या कार्यालयात सुनावणी सुरू आहे.

सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहु अर्जदार यास जन्माची नोंद **ग्रामपंचायत कार्यालय न.प.कार्यालयास नेकनुर ता.बीड** येथील जन्म मृत्यू रजिस्टरला घेवून जन्म प्रमाणपत्र देण्याबाबत कोणाची हरकत असेल तर ह्या जाहिरनाम्याच्या तारखेपासून एक महिन्याच्या आत त्यांनी या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि ह्या लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य पुरावा घेवून त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहु जन्म नोंद **ग्रामपंचायत कार्यालय मौजे नेकनुर ता.जि.बीड** येथील जन्म मृत्यू रजिस्टरला घेवून जन्म प्रमाणपत्र देण्याबाबत आदेशित केले जाईल याची नोंद घ्यावी.

आज दि.२२.०९.२०२५ रोजी माझ्या सही व शिक्क्यानिशी दिले.

सदर प्रकरणात पुढील तारिख २२.१०.२०२५ ही आहे

**स्वाक्षरित/-**
**तहसीलदार,बीड**

## जाहिर प्रगटन

**तहसीलदार,बीड यांचे न्यायालयात**
**जन्म नोंद दावा प्रकरण अर्ज नं.४१४/२०२५**

**शेख महेबुब शेख असाबद्दीन** विरूध्द **ग्रामपंचायत कार्यालय, नेकनुर**
पहा
**१. शेख महेबुब शेख अलावद्दीन**
**रा.नेकनुर ता.जि.बीड**

उपरोक्त प्रमाणे जन्म मृत्यू नोंद दावा प्रकरण विधीज्ञामार्फत या कार्यालयास प्राप्त झाले असुन जन्म धारक **शेख महेबुब शेख अलावद्दीन** यांचा **दिनांक २०.०१.१९९१** रोजी जन्म झालेला असुन त्यांचे जन्म नोंद जन्म मृत्यू नोंदवहीमध्ये घेणे बाबतच्या मागणीच्या अनुषंगाने या कार्यालयात सुनावणी सुरू आहे.

सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहु अर्जदार यास जन्माची नोंद **ग्रामपंचायत कार्यालय न.प.कार्यालयास नेकनुर ता.बीड** येथील जन्म मृत्यू रजिस्टरला घेवून जन्म प्रमाणपत्र देण्याबाबत कोणाची हरकत असेल तर ह्या जाहिरनाम्याच्या तारखेपासून एक महिन्याच्या आत त्यांनी या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि ह्या लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य पुरावा घेवून त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहु जन्म नोंद **ग्रामपंचायत कार्यालय मौजे नेकनुर ता.जि.बीड** येथील जन्म मृत्यू रजिस्टरला घेवून जन्म प्रमाणपत्र देण्याबाबत आदेशित केले जाईल याची नोंद घ्यावी.

आज दि.२२.०९.२०२५ रोजी माझ्या सही व शिक्क्यानिशी दिले.

सदर प्रकरणात पुढील तारिख २२.१०.२०२५ ही आहे

**स्वाक्षरित/-**
**तहसीलदार,बीड**

## जाहिर प्रगटन

**तहसीलदार,बीड यांचे न्यायालयात**
**जन्म नोंद दावा प्रकरण अर्ज नं.४०७/२०२५**

**आतार सलमान महंमद शरीफ** विरूध्द **ग्रामपंचायत कार्यालय, नेकनुर**
पहा
**१. आतार सलमान महंमद शरीफ**
**रा.नेकनुर ता.जि.बीड**

उपरोक्त प्रमाणे जन्म मृत्यू नोंद दावा प्रकरण विधीज्ञामार्फत या कार्यालयास प्राप्त झाले असुन जन्म धारक **आतार सलमान महमद शरीफ** यांचा **दिनांक १४.०२.१९८९** रोजी जन्म झालेला असुन त्यांचे जन्म नोंद जन्म मृत्यू नोंदवहीमध्ये घेणे बाबतच्या मागणीच्या अनुषंगाने या कार्यालयात सुनावणी सुरू आहे.

सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहु अर्जदार यास जन्माची नोंद **ग्रामपंचायत कार्यालय न.प.कार्यालयास नेकनुर ता.बीड** येथील जन्म मृत्यू रजिस्टरला घेवून जन्म प्रमाणपत्र देण्याबाबत कोणाची हरकत असेल तर ह्या जाहिरनाम्याच्या तारखेपासून एक महिन्याच्या आत त्यांनी या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि ह्या लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य पुरावा घेवून त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहु जन्म नोंद **ग्रामपंचायत कार्यालय मौजे नेकनुर ता.जि.बीड** येथील जन्म मृत्यू रजिस्टरला घेवून जन्म प्रमाणपत्र देण्याबाबत आदेशित केले जाईल याची नोंद घ्यावी.

आज दि.२२.०९.२०२५ रोजी माझ्या सही व शिक्क्यानिशी दिले.

सदर प्रकरणात पुढील तारिख २२.१०.२०२५ ही आहे

**स्वाक्षरित/-**
**तहसीलदार,बीड**

## जाहिर प्रगटन

**तहसीलदार,बीड यांचे न्यायालयात**
**जन्म नोंद दावा प्रकरण अर्ज नं.४११/२०२५**

**कुरेशी तौसिफ महंमद हुसेन** विरूध्द **ग्रामपंचायत कार्यालय, नेकनुर**
पहा
**१. कुरेशी तौसिफ महंमद हुसेन**
**रा.नेकनुर ता.जि.बीड**

उपरोक्त प्रमाणे जन्म मृत्यू नोंद दावा प्रकरण विधीज्ञामार्फत या कार्यालयास प्राप्त झाले असुन जन्म धारक **कुरेशी तौसिफ महंमद हुसेन** यांचा **दिनांक १०.०६.१९९५** रोजी जन्म झालेला असुन त्यांचे जन्म नोंद जन्म मृत्यू नोंदवहीमध्ये घेणे बाबतच्या मागणीच्या अनुषंगाने या कार्यालयात सुनावणी सुरू आहे.

सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहु अर्जदार यास जन्माची नोंद **ग्रामपंचायत कार्यालय न.प.कार्यालयास नेकनुर ता.बीड** येथील जन्म मृत्यू रजिस्टरला घेवून जन्म प्रमाणपत्र देण्याबाबत कोणाची हरकत असेल तर ह्या जाहिरनाम्याच्या तारखेपासून एक महिन्याच्या आत त्यांनी या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि ह्या लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य पुरावा घेवून त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहु जन्म नोंद **ग्रामपंचायत कार्यालय मौजे नेकनुर ता.जि.बीड** येथील जन्म मृत्यू रजिस्टरला घेवून जन्म प्रमाणपत्र देण्याबाबत आदेशित केले जाईल याची नोंद घ्यावी.

आज दि.२२.०९.२०२५ रोजी माझ्या सही व शिक्क्यानिशी दिले.

सदर प्रकरणात पुढील तारिख २२.१०.२०२५ ही आहे

**स्वाक्षरित/-**
**तहसीलदार,बीड**

## जाहिर प्रगटन

**तहसीलदार,बीड यांचे न्यायालयात**
**जन्म नोंद दावा प्रकरण अर्ज नं.४०८/२०२५**

**मोहम्मद हुसेन चांदसाब कुरेशी** विरूध्द **ग्रामपंचायत कार्यालय, नेकनुर**
पहा
**१. मोहम्मद हुसेन चांदसाब कुरेशी**
**रा.नेकनुर ता.जि.बीड**

उपरोक्त प्रमाणे जन्म मृत्यू नोंद दावा प्रकरण विधीज्ञामार्फत या कार्यालयास प्राप्त झाले असुन जन्म धारक **कुरेशी आफरीन बेगम मुहम्मद हुसैन** यांचा **दिनांक २५.०९.१९९१** रोजी जन्म झालेला असुन त्यांचे जन्म नोंद जन्म मृत्यू नोंदवहीमध्ये घेणे बाबतच्या मागणीच्या अनुषंगाने या कार्यालयात सुनावणी सुरू आहे.

सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहु अर्जदार यास जन्माची नोंद **ग्रामपंचायत कार्यालय न.प.कार्यालयास नेकनुर ता.बीड** येथील जन्म मृत्यू रजिस्टरला घेवून जन्म प्रमाणपत्र देण्याबाबत कोणाची हरकत असेल तर ह्या जाहिरनाम्याच्या तारखेपासून एक महिन्याच्या आत त्यांनी या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि ह्या लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य पुरावा घेवून त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहु जन्म नोंद **ग्रामपंचायत कार्यालय मौजे नेकनुर ता.जि.बीड** येथील जन्म मृत्यू रजिस्टरला घेवून जन्म प्रमाणपत्र देण्याबाबत आदेशित केले जाईल याची नोंद घ्यावी.

आज दि.२२.०९.२०२५ रोजी माझ्या सही व शिक्क्यानिशी दिले.

सदर प्रकरणात पुढील तारिख २२.१०.२०२५ ही आहे

**स्वाक्षरित/-**
**तहसीलदार,बीड**

**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड**
**जा.क्र.२०२५/सेतु/कावि-२६१ दि.१२.०८.२०२५**

## जाहिर प्रगटन

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय**

अर्जदार **श्रीमान नंदु हिरामण जटाडे, रा.लासुरा ता.अंबड जि.जालना** यांनी यांच्या **मुलगी**च्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म /मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | शितल नंदु जटाडे | मुलगी | २१.१२.२००५ |

निबंधकानी दिलेल्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक- १२/ ०८ /२०२५ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/-**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड**
**जा.क्र.२०२५/सेतु/कावि-२६० दि.११.०८.२०२५**

## जाहिर प्रगटन

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय**

अर्जदार **नंदु हिरामण जटाडे रा.लासुरा ता.अंबड जि.जालना** यांनी यांच्या **मुलगा**च्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म /मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | गणेश नंदु जटाडे | मुलगा | ०२.०८.२००७ |

निबंधकानी दिलेल्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक- ११/ ०८ /२०२५ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/-**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड**
**जा.क्र.२०२५/सेतु/कावि-९८४ दि.३०.०९.२०२५**

## जाहिर प्रगटन

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय**

अर्जदार **श्रीमान ज्ञानेश्वर एकनाथ सवासे, रा.धाकलगांव, ता.अंबड जि.जालना** यांनी यांच्या **मुलगा**च्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म / मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | शुभम ज्ञानेश्वर सवासे | मुलगा | १९.०२.२००७ |

निबंधकानी दिलेल्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक- ३०/ ०९ /२०२५ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/-**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड**
**जा.क्र.२०२५/सेतु/कावि-७३८ दि.०१.१०.२०२५**

## जाहिर प्रगटन

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय**

अर्जदार **श्रीमान शिवम सोमनाथ खराद, रा.डोमलगांव ता.अंबड जि.जालना** यांनी यांच्या **स्वतः**च्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म / मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | शिवम सोमनाथ खराद | स्वतः | ३०.०१.२००५ |

निबंधकानी दिलेल्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक- ०१/१०/२०२५ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/-**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

# हज़रत स.अब्दुल खादर उर्फ स. शाहमिरां कादरी र.अ. यांचा ७३७ वा उर्स थाटात साजरा

नित्रुड /प्रतिनिधी

बीड जिल्ह्यातील माजलगांव तालुक्यात असलेल्या नित्रुड गावात हज़रत स.अब्दुल खादर उर्फ स. शाहमिरां कादरी र.अ. यांचा ७३७ वा उर्स थाटात साजरा करण्यात आला.

दर्ग्याहाला चादर ए गुल (गलाफ) चढविण्यात आली. फातेहानंतर भाविकांना प्रसाद वाटण्यात आला. दिनांक ०४ ऑक्टोबर २०२५ शनिवार रोजी रात्री ८ वाजता कव्वाल्यांचा शानदार कार्यक्रम घेण्यात आला. यात कव्वाल सोफी आसेफअली आणि कव्वाला इरम चिश्ती अजमेरी यांनी कव्वाल्या सादर केल्या तसेच बीड जिल्ह्यातील सुप्रसिद्ध गायक एम.एम.शेख यांनी प्रथमच कव्वाली गायली.संदल, उर्स आणि कव्वालीचे कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मुहम्मद मिसबाहुद्दिन, सय्यद आजम पाशा, सय्यद रज्जाक, नासेर खान पठाण, सय्यद फैजुद्दिन, सय्यद रहिम, स.हाकीम, स. जमील, मुहम्मद मुखीद, सय्यद सलिम, मुहम्मद अयाज़ोद्दीन, सय्यद नईम, मुहम्मद इकबाल, मुहम्मद अनीस, मुहम्मद साद, सय्यद आमेर, सय्यद रेहान, मुहम्मद आसेफ, सद्दाम पाशा, सय्यद जुनेद, सय्यद काबातुल्ला, सय्यद रफिक, मुहम्मद मुन्तखबोद्दीन, हारूण पठाण, सय्यद फईम, सय्यद अलीम, मुहम्मद रूकनोद्दीन, अदनान खान, मुजाहेद, मुहम्मद अतीख, सय्यद खदीर, सय्यद अजीम, सय्यद परवेज, मुहम्मद मुजीब,



सय्यद इलयास, मुहम्मद निजामोद्दीन, सय्यद मुनीर, सय्यद अहेमद, सय्यद शोयब, सय्यद मसुद, सय्यद हाशीम, मुहम्मद मसीहुद्दीन, सय्यद सद्दाम, शहेबाज खान, सय्यद हुस्न मुबारक, सय्यद आयान, सय्यद नोमान, मुहम्मद उमेर, सय्यद जायेद, सय्यद युसूफ, पाशा आझम, सय्यद मंसुर पाशा, सय्यद सरफराज पाशा, कॉ. दत्तात्र्य डाके, उत्तम मंजु जाधव, कॉ. सुभाष डाके, शेख चाँद शेख खुद्दूस, अशोकराव बोरवाटे, दिपकराव बोरचाटे, आबासाहेब गायकवाड, कॉ. संदीपान तेलगड, मनोहर तात्या डाके, दिनेश गायकवाड, बंडु डिगांबर राठोड, शरद बोरवाटे, दत्तात्रय वि. डाके, पोपट गायकवाड, उध्दवराव बोरचाटे, शेख शफिक, विकास डाके, प्रताप डाके, रामदिप डाके, कामराज बोरचाटे, नारायण तातोडे, ड. अरूण कुलकर्णी, ड. अशोक डाके, गोपाळ कुलकर्णी, अर्जन पवार, अशोक पं. पवार, बबन पवार सर, अतीखभाई, समीर बेग, महारूद्र कोथंबिरे, बालासाहेब तेलगड, शेख मजरभाई, दिपकराव घोडके, विजय जाधव, राठोड बाबुराव, उत्तम हाच्चु राठोड, डॉ. शेख खमर, सय्यद निजाम आलम, सय्यद मिर, सय्यद शकील यासीन, नितिन भिमराव पवार, गणपत शामराव पवार, सुखदेव धुले, आप्पासाहेब बडे, बेग फेराज, गोरखनाथ बादाडे, रामभाऊ राऊत, गोरे नवनाथ, भालेकर हनुमंत, तेलगड जनक, हाके बळीराम, शंकर बडे, अशोक तातोडे, बड़े सत्यप्रेम, शेख शायक, अमर बोरघाटे, फुलचंद कटारे, शेख हामिदभाई, शंकर पवार, संतोष डाके, आगे, शिवाजी डाके, गोपाळ हरी पवार, बाळासाहेब तेलगड, बालासाहेब देशमुख, हनुमंत भालेकर, राहुल आवड, पांडुरंग उबाळे, सय्यद रफिक, शेख सादेक, शेख मुखीद, शेख इरफान, शेख युनूस युसूफ, ड. सतिष बोरचाटे, अविनाश बोरघाटे, भाऊसाहेब रणदिवे, दादासाहेब सोमा पवार, कांतराव तेलगड, संभाजी शिंदे, सुरेश कापसे, वेग फेरोज, आप्पा आढाव, रामचंद्र आढाव, नरेश बोरचाटे, सय्यद रफीक, शिवाजी धापसे, आवाड विष्णु, शेख नासेर, रामभाऊ पवार, शिंदे ज्ञानोबा, तलाठी मॅडम, भुरके, शेख रऊफ रशिद, सर्पतराव सोनवणे, पार्थराज टाले, संजय तिडके, राघव कुलकर्णी, सुर्यभान गायकवाड, कॉ. रामभाऊ पवार, सुनिल लोंढे, विकास अजय तिडके, विपूल राठोड, रामदास बडे, माऊली तिडके, शेख ज़हीरभाई, बाबासाहेब डाके, बसवेश्वर मोगरकर, शिवाजी तेलगड, भारत लोंढे, स्थागत डाके, अशोक गायके, शिवाजी बडे, शामराव राठोड, विजय पवार, गजानन डाके, काशीनाथ राठोड, भगवान राठोड, स. हादीस, अर्जुन डाके, राजेभाऊ डाके, एकनाथ हाके, शंकर डाके, सुग्रीव करपे, राजेभाऊ पवार, सोमनाथ मुंडे, पांडुरंग आवाड, भानुदास आवाड, रंगनाथ शिंदे, गौतम शिंदे सर, गजानन मिरान, दता घुले, शिवाजी धापसे, शिवाजी राऊत, शेख शाकेब, समीर बेग, बाबुलाल पवार, शेख अय्युब, शेख मुसा, शेख महेबुब युनुस, शेख रऊफ, सुनिल गायके, गणेश गिराम, शेख अतीख, शेख रहिम, शेख विखार आदींनी परिश्रम घेतले.



# सहकार भारतीचे राष्ट्रीय संघटन मंत्री श्री संजयजी पाचपोर यांचा राजाराम काकाणी सहकार विद्या मंदिरास भेट

धर्माबाद (अशोक पडोळे)

दिनांक ५ ऑक्टोबर रोजी सहकार भारतीचे राष्ट्रीय संघटन मंत्री श्री. संजयजी पाचपोर यांच्या धर्माबाद येथील भेटी दरम्यान सहकारी तत्वावर सुरू असलेल्या श्री राजाराम काकाणी सहकार विद्या मंदिर या विद्यालयास भेट देण्यात आली. सहकार क्षेत्रात अल्पावधीत सर्वोत्तम कार्य व कमी कालावधीत शाळेला उइडए दर्जा प्राप्त करून दिल्यामुळे संस्थेचे मॅनेजिंग डायरेक्टर श्री. सुबोध काकाणी यांचा यथोचित स्मृतिचिन्ह देऊन सन्मान करण्यात आला. राजाराम काकाणी सहकार विद्या मंदिर या संस्थेने ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण मिळावे यासाठी सहकारी तत्वावर हे विद्यालय स्थापन केले असून, शिक्षण क्षेत्रात एक मोठी भरारी घेण्याचे कार्य त्यांनी केले आहे.

या विद्यालयात आधुनिक शिक्षण पद्धतींसह संस्कारांचे संगोपन होत असून, आंतरराष्ट्रीय दर्जाचे शैक्षणिक वातावरण विद्यार्थ्यांना उपलब्ध करून देण्यात आले आहे. धर्माबाद तालुक्यातील शेतकरी व मध्यमवर्गीय कुटुंबांसाठी ही संस्था एक उत्तम पर्याय ठरत आहे.

श्री. संजयजी पाचपोर यांनी विद्यालयाला भेट दिल्यानंतर आपला अभिप्राय नोंदविताना म्हटले - राजाराम काकाणी सहकार विद्या मंदिरास भेट देण्याचे सौभाग्य मला लाभले. आधुनिक युगातील गुरुकुल प्रत्यक्ष पाहण्याचा अनुभव मिळाला. ही माझ्या स्वप्नातील सहकारी शाळा आहे. जीवनातील विविध कलागुणांना संस्कारांची जोड देणारे हे गुरुकुल प्रत्येक जिल्ह्यात सुरू व्हावे, अशी माझी इच्छा आहे. अशा प्रकारच्या संस्थांमुळे सहकार चळवळीला नवसंजीवनी मिळेल. हे गुरुकुल सतत वर्धिष्णु होवो व सहकार प्रेमींसाठी प्रेरणास्थान राहो, हीच सदिच्छाया भेटीप्रसंगी सहकार भारतीचे पूर्णवेळ महाराष्ट्र प्रदेश संघटक श्री. प्रवीण गायकवाड, नांदेड जिल्ह्याचे महामंत्री श्री. दत्ता उबाळे, धर्माबाद शहरातील भाजपा किसान मोर्चाचे जिल्हाध्यक्ष श्री. रविंद्र पोतगंटीवार तसेच संस्थेचे प्राचार्य श्री. सौरभ सक्सेना उपस्थित होते.

# ज्येष्ठ नागरिकांचा योग्य सन्मान राखला जावा - मुअ सुनिल चव्हाण

गेवराई /प्रतिनिधी

एकत्र कुटुंब पद्धती लयाला जात असल्याने कलह निर्माण होत आहेत. घरात वयोवृद्ध व्यक्ति नसल्याने नियंत्रण राहिले नाही. देशाची खरी संपती असलेल्या सर्व जेष्ठ नागरिकांचा यथायोग्य मान राखून युवापिढीकडून त्यांचा सन्मानच झाला पाहिजे असे प्रतिपादन न्यू हायस्कूलचे मुख्याध्यापक सुनिल चव्हाण यांनी केले.

गेवराई येथील रोटरी क्लबच्या वतीने आंतरराष्ट्रीय जेष्ठ नागरिक दिनाचे औचित्य साधून १ ऑक्टोबर २०२५ रोजी सकाळी १० वाजता जेष्ठ नागरिक सन्मान व प्रबोधन सोहळा आयोजित करण्यात आला होता. अध्यक्षस्थानी न्यू हायस्कूल शाळेचे मुख्याध्यापक सुनिल चव्हाण हे होते. प्रमुख उपस्थिती सामाजिक कार्यकर्ते एस. वाय. अन्सारी, रोटरी क्लब ऑफ गेवराईचे अध्यक्ष प्रा. राजेंद्र बरकसे, सचिव प्रविण जैन यांची होती. सुरुवातीला रोटरी इंटरनॅशनलचे संस्थापक पॉल हॅरिस यांच्या प्रतिमेचे



रोटरी क्लबचा स्तुत्य उपक्रम

पूजन करण्यात आले. जेष्ठ कलावंत विष्णुप्रसाद खेत्रे यांनी स्वागत गीत सादर केले. उपस्थित मान्यवरांचे स्वागत जेष्ठ नागरिक संघाचे अध्यक्ष प्रा. संदिपान हिंगे, ईश्वर आबदरे, बाबुरावला नागरगोजे ,रो. राजेंद्र डेंगे ,एस. पी सूर्यवंशी ,सखाराम कानगुडे आदींनी केले. प्रास्ताविकात रोटरी क्लबचे अध्यक्ष प्रा. बरकसे यांनी क्लबने केलेल्या कामांचा आढावा घेतला.यावेळी प्रा. सुरेश पाटील यांचे निसर्गोपचार या विषयावर तर ड. सुभाष निकम यांनी जेष्ठ नागरिकांचे हक्क व जबाबादाऱ्या या विषयावर मार्गदर्शन केले. जेष्ठ नागरिक दिनाचे औचित्य साधून वयोवृद्ध जेष्ठ नागरिक स्वातंत्र्यसैनिक बाबुराव पिंपळे, व्यंकटराव पंडित देवराव कांडेकर नसीर पठाण, धन्यकुमार जैन आदींचा सन्मानचिन्ह, शाल, श्रीफळ देवून सन्मानित करण्यात आले. यावेळी एस. वाय. अन्सारी यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. सूत्रसंचालन गणेश कुलकर्णी यांनी केले.कार्यक्रमास रोटरी क्लबचे संचालक सदस्य डॉ. विजय सिकची, राजेंद्र डेंगे, राधाकिसन लड्डा, रामदास शिंदे ,प्रा. आर. डी. मुंडे, जेष्ठ नागरिक संघाचे सखाराम कानगुडे, राजेंद्र झंवर,दिलीप काकडे, बाबुराव मोताळे ,रामकृष्ण चेडे ,प्रा. अंकुश चव्हाण,एस.पी. सूर्यवंशी, प्रभाकर घोडके, प्रकाश दावणगिरे, साहेबराव बडे ,शिवप्रसाद भुतडा ,अरूण परदेशी ,नागनाथ घसिंग ,अब्दुल मुखीदभाई ,गौतम कांडेकर ,कैलास चौधरी, सुरेश आतकरे ,भास्कर ननवरे ,त्रिंबक गरड, बंडू गायकवाड, ओमप्रकाश बाहेती, विलास मडकर, अर्जून माने, संजय हिंगे यांच्यासह जेष्ठ नागरिक मोठया संख्येने उपस्थित होते.

# बुद्धिबळाचा उगवता सितारा: बीडच्या सोहम लांगोरेची जिल्हा स्पर्धेत पुन्हा बाजी

बीड /प्रतिनिधी

बीडच्या बुद्धिबळ विश्वात सोहम लांगोरे या नवोदित खेळाडूचे नाव सध्या चमकत आहे.चंपावती विद्यालयातील इयत्ता ९ वी मध्ये शिकणाऱ्या या होतकरू खेळाडूने काल झालेल्या बीड जिल्हा बुद्धिबळ स्पर्धेत सलग दुसऱ्या वर्षी प्रथम क्रमांक पटकावून आपल्यातील कौशल्याची पुन्हा एकदा चुणूक दर्शवली आहे.

१६०० इतकी प्रभावी फिडे रेटिंग असलेला सोहम हा आंतरराष्ट्रीय स्तरावर मानांकन प्राप्त केलेला खेळाडू आहे. त्याचे स्वप्न आहे बुद्धिबळातील सर्वोच्च मानला जाणारा ग्रँड मास्टर हा किताब मिळवण्याचे, आणि या दिशेने त्याचा प्रवास जोमाने सुरू आहे.

सोहमने केवळ बीड जिल्ह्यातच नव्हे, तर राज्यभरातील अनेक आंतरराष्ट्रीय फिडे चेस स्पर्धांमध्ये आपली छाप सोडली आहे.



अहिल्यानगर, सांगली, पुणे, संभाजीनगर, नाशिक, पाथर्डी, धाराशिव, येडशी, श्रीरामपूर आणि आळंदी येथे झालेल्या स्पर्धांमध्ये त्याने अनेक पदके आणि रोख बक्षिसे जिंकली आहेत. या यशामुळे तो महाराष्ट्रातील बुद्धिबळपटूंमध्ये एक आश्वासक चेहरा म्हणून पुढे येत आहे.

सोहमला दत्तात्रेय क्षीरसागर आणि रामप्रसाद शेंडगे सरांचे बहुमोल मार्गदर्शन मिळत आहे. त्याचबरोबर बीड डिस्ट्रिक्ट चेस असोसिएशनचे सचिव अशोक कागदे सरांचे सहकार्यही त्याच्या पाठीशी उभे आहे.

बुद्धिबळातील यशापूर्वी, सोहमने श्री रविशंकर बाल विद्या मंदिरात पहिलीत असताना युवातर्फे घेण्यात आलेल्या 'मास्टर स्ट्रोक' चित्रकला स्पर्धेतही मुंबईपर्यंत मजल मारत स्टेट विनर होण्याचा मान मिळवला होता.ही त्याची बहुआयामी प्रतिभा दर्शवते.सोहमचे सध्याचे संपूर्ण लक्ष आगामी विभागीय व राज्यस्तरीय बुद्धिबळ स्पर्धांवर केंद्रित आहे आणि तो त्यासाठी कसून सराव करत आहे.बीडचा हा 'उगवता सितारा' भविष्यात आंतरराष्ट्रीय स्तरावर नक्कीच मोठी कामगिरी करेल, यात शंका नाही. त्याच्या पुढील सर्व स्पर्धांसाठी अनेकांनी त्याला मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या आहेत.

# आमदार दांपत्यासह संपूर्ण भाजपा कार्यकारणी पीक कापणी प्रयोगाची सत्यता पडताळण्यासाठी शेतीच्या बांधावर

**धर्माबाद (अशोक पडोळे)**

**आमदार राजेश पवार, यांच्या सुविद्य पत्नी सौ.पुनमताई पवार व नायगाव विधानसभा मतदारसंघातील धर्माबाद उमरी व नायगाव तालुक्यातील भाजपा कार्यकारणीतील सर्व पदाधिकारी आणि सदस्य हे पीक कापणी प्रयोगाची सत्यता पडताळण्यासाठी आज शेती बांधावर पोहोचले आहेत.**

यावर्षी सततच्या अतिवृष्टीमुळे नायगाव विधानसभा मतदार संघासह अख्या महाराष्ट्रातील पिके नष्ट झाली आहेत. ओला दुष्काळ सदृश्य परिस्थिती सगळीकडेच निर्माण झाली आहे. त्या पार्श्वभूमीवर विविध पक्षांचे आमदार खासदार, माजी आमदार खासदार, तद्वतच अनेक पक्षांचे पदाधिकारी यांनी आजपर्यंत शेतकऱ्यांचे कोरडे सात्वन करून फोटोसेशन करीत फार मोठे कार्य केल्याचे दाखवण्याचा केविलवाणा प्रयत्न केला. मात्र आमदार राजेश पवार हे सर्वापेक्षा आगळे वेगळे ठरले! त्यांनी अतिवृष्टीच्या काळात आपल्या मतदार संघातील प्रशासनास कामाला लावले. जीवित हानी आणि व पशुधन वाचवण्यावर त्यांनी भर दिला. तद्नंतर पावसामुळे पीडित



झालेल्यांना शासकीय मदत कायमस्वरूपी मिळवण्यासाठी ते आजतागायत प्रयत्नशील आहेत.

पिक विमा कंपन्यांच्या संदर्भात शेतकऱ्यांच्या अनेक वेगवेगळ्या तक्रारी प्राप्त होत असताना यावर्षी पीक कापणी प्रयोगाला प्राधान्य दिले गेले असल्यामुळे पिक विमा कंपनीतर्फे शेतकऱ्यांना जास्तीत जास्त पैसे मिळावे याच्यासाठी पीक कापणी प्रयोग निकष पूर्ण होत आहेत का? या संदर्भात आमदार राजेश पवार,सौ.पुनमताई पवार व संपूर्ण नायगाव विधानसभा मतदारसंघातील भाजपा कार्यकारणी ज्यांच्या त्यांच्या कार्यकक्षेत कामाला लागले आहेत .

चार वर्षापासून पिक विमा कंपन्यांना आमदार राजेश पवार यांनी अक्षरशः धारेवर धरत शेतकऱ्यांच्या पदरात जास्तीची रक्कम पाडून देण्यात सिंहाचा वाटा उचलला आहे. पिक विमा कंपनीच्या सर्व्हे करणाऱ्या अधिकाऱ्यांमध्ये दहावी व बारावी पास नापासची मुले ज्यांना कुठलेच ज्ञान सदरील सर्वेच्या निकषाबद्दल माहित नाही अशी मुले कंपनीने लावून थातूरमातूर व अर्थपूर्णदृष्ट्या सर्वे करून ज्यांची पिके खरोखरच पाण्याखाली गेली होती त्यांना काहीच रक्कम मिळाली नाही आणि ज्यांची पिके आली त्या शेतकऱ्यांना मात्र पीक विमा मिळाला ही कार्यप्रणाली अवलंबली होती. या संदर्भात आमदार राजेश पवार यांनी मोठ्या प्रमाणात आवाज उठवून पिक विमा कंपनीला अगदी उघडे नागडे केले होते. हीच परिस्थिती पुन्हा शेतकऱ्यांची होऊ नये म्हणून आज त्यांनी अख्खा नायगाव मतदार संघ पिंजून काढत आहेत व निकषपूर्ण पीक कापणी प्रयोग करण्यास भाग पाडत आहेत.

**उपरोक्त पार्श्वभूमीवर प्रस्तुत प्रतिनिधीने बाभळी बंधारा कार्य कक्षेतील बॅकवॉटरच्या संदर्भात विचारले असता यावर आपण कायमस्वरूपी तोडगा काढण्यासाठी शासन दरबारी अति तातडीचे प्रयत्न करीत असून त्या गोष्टीला लवकरच यश येण्याची संकेत दिसत असल्याचे प्रतिपादन आमदार राजेश पवार यांनी करीत यावर्षी मात्र सर्व शेतकऱ्यांना शासनाची व पीक विम्याची जास्तीत जास्त रक्कम मिळावी यासाठी प्रयत्न करीत असल्याचे सांगितले.**

# शिक्षणातून स्वतंत्र विचार करण्याची क्षमता विकसित झाली पाहिजे - कुलगुरू डॉ. पंडित विद्यासागर

पुणे /प्रतिनिधी

शिक्षणातून मुलांच्यामध्ये स्वतंत्र विचार करण्याची क्षमता विकसित झाली पाहिजे परंतु दुर्दैवाने आज शिक्षण व्यवस्था याकडे गांभीर्याने लक्ष देत नाही. मुलांना स्वातंत्र्य दिल्यास त्यांची प्रज्ञा आणि प्रतिभा फुलते. शिक्षण, संस्कार आणि अनुवंशिकता या घटकांचा मुलांच्या जडणघडणीमध्ये आणि त्यांच्या सर्जनशील निर्मिती क्षमता यावर परिणाम होत असतो असे प्रतिपादन स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. पंडित विद्यासागर यांनी केले.ते कु. आर्यही नितीन कुंभार लिखित शेजारच्या गोष्टी



या लघुकथा संग्रहाच्या प्रकाशन समारंभ प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. या समारंभाच्या अध्यक्षस्थानी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे तत्त्वज्ञान विभाग प्रमुख प्रा. डॉ. हरीश नवले होते. तर विचारपीठावर प्राचार्य डॉ. नागोराव कुंभार, डायमंड प्रकाशनचे पास्ते, सुप्रसिद्ध चित्रकार संदीप देशपांडे, सई देशपांडे, स्मिता धर्माधिकारी, प्रेमा कुंभार, नितीन कुंभार, प्रीती कुंभार आणि शुभांगी कुंभार आदी उपस्थित होते.अध्यक्षीय समारोप तत्वज्ञान विभाग प्रमुख प्रा. डॉ. हरिश नवले यांनी केला.या कार्यक्रमास माजी तत्वज्ञान विभाग प्रमुख डॉ. आकाशकर, प्रा. डॉ. टंडन, प्रा. डॉ. आशिष सांगळे, प्रा. डॉ. भोये, तेज निवळीकर, विवेक घोटाळे, राजेंद्र भोईरवार, गणेश आणि तत्त्वज्ञान विभागातील सर्व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.या कार्यक्रमाचे सूत्रसंचलन प्रा. शिवाजी मोटेगावकर आणि आभार प्रदर्शन डॉ. सुनील राऊत यांनी केले.

# शेतकऱ्यांच्या तोंडाशी आलेला घास पावसाने नायनाट केला हेक्टरी एक लाख भरपाई शासनाने द्यावी - मराठा महासंघ



बीड /प्रतिनिधी

पावसामुळे शेतकऱ्यांच्या जमिनी पुर्णपणे वाहुन गेलेल्या आहेत. शेतकऱ्यांचा तोंडाशी आलेला घास पावसामुळे सर्व नायनाट झालेला आहे. हेक्टरी एक लाख नुकसान भरपाई द्यावी आणि तात्काळ ओला दुष्काळ जाहिर करून सरसकट कर्ज माफी करावी अशी अखिल भारतीय मराठा महासंघाने मागणी केली आहे.

या मागणीकडे शासनाने दुर्लक्ष केल्यास अखिल भारतीय मराठा महासंघ रस्त्यावर उतरेल असा इशारा अखिल भारतीय मराठा महासंघाचे मराठवाडा अध्यक्ष गोपाळ चव्हाण, मराठवाडा सरचिटणीस विनोद आप्पा इंगोले, बीड जिल्हा अध्यक्ष बापूसाहेब साळुंके,युवक जिल्हाध्यक्ष भागवत मस्के, यांच्यासह बीड बंडू आप्पा कोलगडे, बापूसाहेब मराठे, शाम गायकवाड, सुमंत खांडे, परमेश्वर कवचट, राहुल शिंदे, शिवाजी हिदुळे, रवि जोगदंड, दत्ता शेळकेसह पदाधिकाऱ्यांनी दिला आहे.

हे पत्रक मालक,मुद्रक,प्रकाशक,संपादक वैभव विवेक स्वामी यांनी इंद्रधनुष्य प्रिंटिंग ॲण्ड पब्लिशर्स,सावता माळी चौक,मोंढा रोड,बीड,जिल्हा बीड येथे छापून दैनिक समर्थ राजयोग कार्यालय,छत्रपती कॉलनी,तहसील बॅक साईड,क्रांती नगर, बीड,जिल्हा बीड - ४३ ११ २२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER, EDITOR VAIBHAV VIVEK SWAMI AT ENDRADHANUSHYA PRINTING AND PUBLISHERS, SAVATA MALI CHOWK, MONDHA ROAD, BEED. DIST. BEED AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAINIK SAMARTH RAJYOG, CHATRAPATI COLONY, TAHASHIL BACK SIDE, KRANTI NAGAR, BEED, DIST. BEED-431122 ( MAHARSHTRA ).

# सांगवी पाटण येथे सुवर्ण महोत्सवी
# अखंड हरिनाम सप्ताह सोहळा

## संत कृपा हाच खरा तारणहार,संतांनी केलेले उपकार शब्दात सांगता येत नाही - रामराव महाराज ढोक



आष्टी - (प्रतिनिधी) आष्टी तालुक्यातील सांगवी पाटण येथे सुवर्ण महोत्सवी अखंड हरिनाम सप्ताह निमित्त शनिवार दि. ०४/१०/२०२५ रोजी संध्याकाळी ह. भ. प. रामराव महाराज ढोक (नागपूरकर) यांची कीर्तनाची सेवा संपन्न झाली.

या कीर्तनात त्यांनी संत सेना महाराज यांचा ओंजळीस आलेला उदार तुम्ही संत! मायबाप कृपावंत!! या ओळी सुरुवातीला असलेला एक अभंग सादर केला. या अभंगाद्वारे त्यांनी श्रोत्यांच्या मनात संतांच्या कृपेचे, उपकारांचे आणि मार्गदर्शनाचे सुवर्णाक्षर कोरून दिले. कीर्तनकार रामराव महाराज ढोक यांनी सादर केलेल्या या अभंगातून संतांच्या महत्त्वाचे खोलवर विश्लेषण केले. अभंगातील उदार तुम्ही संत! मायबाप कृपावंत!! या ओळीतून संत हे केवळ उपदेशक नसून, मायेचे आणि कृपेचे सागर, मायबाप स्वरूप आहेत, ही भावना व्यक्त झाली आहे. केवढा केला उपकार ! काय वाणू मी पामर!! या ओळीतून साधक स्वतःला पामर (अत्यंत क्षुल्लक) म्हणवून घेऊन, संतांनी केलेला उपकार शब्दात सांगता येणार नाही इतका मोठा आहे, याची खंत व्यक्त केली आहे. जड जीवा उद्धार केला! मार्ग दाखविला सुपंथ !! यामध्ये संतांनी जड आणि भौतिकतेत गुरफटलेल्या जीवाला सहजासहजी उद्धरून, त्याला परमार्थाचा सरळ मार्ग (सुपंथ) दाखविला, याचे वर्णन आहे. शेवटच्या दोन ओळी सेना म्हणे उतराई ! होता काही दिसेना !! यात संत सेना महाराज सांगतात की, संतांनी केलेल्या या सर्व उपकारांची परतफेड (उतराई) करणे शक्य नाही, कारण संतांच्या कृपेपूर्वी साधकाला काहीच दिसत नव्हते, म्हणजेच त्याची स्थिती अंधारातील होती.

अभंगामागील संदेश स्पष्ट करताना कीर्तनकार म्हणाले, की संत - कृपा हाच खरा तारणहार आहे आणि संतच भक्ताला भगवद्प्राप्तीचा सोपा मार्ग दाखवितात. ही कीर्तन सेवा उत्साहात, भक्तिभावातून पार पडली. यावेळी सांगवी पाटण व पंचक्रोशीतील भक्त, संत, महंत मोठ्या संख्येने उपस्थित होते. सप्ताह समितीने या कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन केले होते.



## प्रभु रामचंद्र विद्यालयाच्या तीन विद्यार्थिनींची विभागीय कुस्ती स्पर्धेसाठी निवड

आष्टी - (प्रतिनिधी) बीड जिल्हास्तरीय कुस्ती स्पर्धेसाठी निवड झालेल्या पाच विद्यार्थिनींपैकी तीन विद्यार्थिनींची विभागीय स्पर्धेसाठी निवड करण्यात आली. यामध्ये कु. पोटे समृद्धी संतोष, कु. काळे काजल यमाजी, कु. वाघुले विद्या सचिन या विद्यार्थिनींची विभागीय स्पर्धेसाठी निवड करण्यात आली असून कु. विधाते अनुष्का जालिंदर व कु. विधाते श्रावणी लक्ष्मण या विद्यार्थिनींनी जिल्हास्तरीय कुस्ती स्पर्धेमध्ये द्वितीय क्रमांक मिळवला आहे.विद्यार्थिनींच्या यशाबद्दल संस्थेचे संस्थापक अध्यक्ष मा. आमदार भीमरावजी धोंडे साहेब, युवा नेते अजय दादा धोंडे, अभय राजे धोंडे, प्रशासकीय अधिकारी डॉ. डी. बी. राऊत सर, प्रा. शिवदास विधाते सर, माऊली बोडखे सर, संजय शेंडे सर, प्रा. नन्नवरे सर, प्रा. वाघुले सर विद्यालयाचे मुख्याध्यापक राजाराम नरुटे सर, क्रीडा शिक्षक सुरेश दिंडे सर, सर्व शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी अभिनंदन करून पुढील राज्यस्तरीय स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.



### आवो आवो सावरिया आवो... छप्पन भोग लगावो....
### शिवनगरीत गोवर्धन गिरीधारी आणि गोपाळकाला

माजी मंत्री शिवाजीराव पंडित यांच्यासह मान्यवरांची उपस्थिती

माजी मंत्री शिवाजीराव (दादा) पंडित यांच्या अभिष्टचिंतन सोहळ्याच्या निमित्ताने भागवत कथेत गोपाळकाला झाला. यावेळी भागवताचार्य समाधान महाराज शर्मा यांनी आपल्या मधूर वाणीतून कथेचे पाचवे पुष्प गुंफले. यावेळी गोवर्धन पर्वत भगवान श्रीकृष्णाने उचललेला देखावा सादर करण्यात आली....

आजच्या कथेची ही कांही छायाचित्रे !!

# राज्यात पहिल्यांदा आ.सुरेश धस यांच्या मागणीची मुख्यमंत्री यांनी घेतली दखल

## अतिवृष्टीत खरडून गेलेल्या जमिनींसाठी हेक्टरी ३ लाख ४७ हजार रू. मिळणार, शेतकऱ्यांच्या बाजूने ऐतिहासिक निर्णय

आष्टी - (प्रतिनिधी) मराठवाडा भूषण लोकनेते आ. सुरेश अण्णा धस यांच्या शेतकरी हिताच्या लढ्याला सलाम करावा असा निर्णय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि मंत्रिमंडळाने घेतला आहे. याबाबत चे सविस्तर वृत्त असे की, अतिवृष्टी आणि पुरामुळे राज्यातील लाखो शेतकऱ्यांच्या जमिनी खरडून गेल्या. मातीतून उपजीविका करणाऱ्या शेतकऱ्यांचे जीवन अक्षरशः उद्ध्वस्त झाले. या संकटाकडे पाहून लोकनेते आमदार सुरेश आण्णा धस यांनी राज्यात सर्वप्रथम पुढाकार घेऊन, अशा जमिनींना मनरेगा योजनेत समाविष्ट करून शेतकऱ्यांना मदत देण्याची ठोस आणि व्यवहार्य मागणी मुख्यमंत्री महोदयांकडे केली होती.

या ऐतिहासिक आणि शेतकरी हिताच्या मागणीची मुख्यमंत्री महोदयांनी दखल घेत मनरेगा योजनेतून हेक्टरी रु. ३ लाख



आणि राज्य शासनाकडून अतिरिक्त रु. ४७ हजार, अशा एकूण रु. ३ लाख ४७ हजार रुपयांची मदत जाहीर केली आहे. हा निर्णय म्हणजे खरडून गेलेल्या जमिनींना पुनर्जीवन देणारा दिलासा ठरणार आहे.

याशिवाय, एनडीआरएफ च्या विद्यमान दोन हेक्टर मर्यादेच्या पुढे जाऊन मुख्यमंत्री महोदयांनी तीन हेक्टर क्षेत्रपर्यंतच्या शेतजमिनींना मदतीस पात्र करण्याचा क्रांतिकारी निर्णय घेतला आहे. या निर्णयामुळे कडी, सीना, सिंदफणा, मांजरा आणि राज्यातील इतर छोट्या - मोठ्या नदी खोऱ्यांतील शेतकरी वर्गाला थेट लाभ होणार आहे.

तसेच, बुजलेल्या विहिरींमधील गाळ काढण्यासाठी रु. ३० हजार रुपयांची विशेष तरतूद, शेतीपयोगी जलस्रोत पुनर्संचयित करण्यासाठी केली गेली आहे. या सर्व उपाययोजनांसाठी शासनाने एकूण रु. ३१६२८ कोटी रुपयांचे भरीव पॅकेज जाहीर केले आहे, जे मागील काही वर्षांतील सर्वांत मोठं शेतकरीहिताचं पॅकेज मानलं जात आहे.

शेतकऱ्यांच्या समस्येकडे दूरदृष्टीने पाहून, त्यासाठी राज्याच्या सर्वोच्च पातळीवर आवाज उठवून ठोस निर्णय घडवून आणणारे आ. सुरेश आण्णा धस हे खरं तर कष्टकरी समाजाचे खरे प्रतिनिधी आहेत. त्यांच्या प्रयत्नांमुळे केवळ शिरूर (कासार) मतदारसंघातीलच नव्हे, तर संपूर्ण महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना दिलासा मिळाला आहे. शेतकऱ्यांच्या दुःखाकडे केवळ सहानुभूतीने नव्हे तर कृतीने पाहणारा नेता म्हणजेच लोकनेते सुरेश अण्णा धस. त्यांच्या या प्रयत्नाबद्दल कष्टकरी समाजमन, शेतकरी वर्ग आणि जनतेच्या मनात प्रचंड कृतज्ञता व्यक्त होत आहे. लोकनेते आ. सुरेश आण्णा धस यांच्या शेतकरी हिताच्या लढ्याला सलाम.

# लाल बहादूर शास्त्री विद्यालयात कोजागिरी पौर्णिमेनिमित्त संगीत रजनी व कुटुंब प्रबोधन व्याख्यान संपन्न



उदगीर (प्रतिनिधी)

येथील लाल बहादूर शास्त्री माध्यमिक विद्यालयात कोजागिरी पौर्णिमेनिमित्त संगीत रंजनी व व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी व्यासपीठावर कार्यक्रमाचे अध्यक्ष शंकरराव लासूणे प्रमुख वक्ते उमाकांत कुलकर्णी, गोपाळ जोशी सतनप्पा हुरदळे, व्यंकटराव गुरमे, बंडू सताळकर, षन्मुखानंद मठपती, अंजलीताई नळगीरकर, कल्याणी जोशी, अश्विनी निडवदे, अनुराग भोसले,मुक्तेश्वर बंज्जीपल्ले, पृथ्वीराज एरकुंडे, प्रशांत चिमेगावे, मुख्याध्यापक संजय कुलकर्णी, उपमुख्याध्यापक ज्ञानेश मातेकर, पर्यवेक्षक कृष्णा मारावार, किरण नेमट, माधव मठवाले, प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक अंकूश मिरगुडे, सीबीएसई शाळेचे प्राचार्य श्रीपाद सीमंतकर उपस्थित होते.

प्रमूख वक्ते उमाकांत कुलकर्णी यांनी त्यांच्या मनोगतात कुटूंब प्रबोधन या विषयावर सखोल मार्गदर्शन केले. ते म्हणाले की सकारात्मक विचार ,एकत्र राहणे, एकत्र फिरायला जाणे, कुटूंबातील भाषा, यांचा परिणाम मुलांवर होतो, म्हणून तो योग्य असावा. असे सांगितले.

सतनप्पा हुरदळे यांनी राष्ट्राला परम वैभव प्राप्त करायचे असेल तर कुटूंब प्रबोधनाची आवश्यकता आहे, असे सांगितले. गोपाळ जोशी व त्यांच्या संगीत संचाने संगीत रजनी कार्यक्रमाला बहर आणला.त्यांनी भक्तीगीत,अभंग व भावगीत सादर करून श्रोत्यांची वाहवा मिळवली.आज कुणीतरी यावे, उगवला चंद्र पूनवेचा, हे चांदणे फुलांनी शिंपीत रात्र आली असे अनेक गाणे सादर केले.या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विजयाराणी गोविंदवाड, प्रीती शेंडे. स्वागत परिचय, प्रास्ताविक संदिप चाटे, आभार माधव मठवाले यांनी केले.

या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी कार्यक्रम प्रमूख संदिप चाटे व राजेश गौतम, अभ्यास पुरक मंडळ प्रमुख सौ.अनिता येलमाटे तसेच सर्व शिक्षकवृंद यांनी परिश्रम घेतले.

पसायदानाने कार्यक्रमाची सांगता झाली.

# माहेश्वरी सभेकडून हजारो रुग्णांना दम्याचे मोफत औषध वाटप



माजलगाव :

प्रतिवर्षी प्रमाणे यावर्षी ही दि ६ ऑक्टोंबर रोजी शहरतील राजस्थानी मंगल कार्यालय येथे प्रसिद्ध आयुर्वेदचार्य स्व चंदूलालजी कलंत्री यांच्या दमा औषधीचे सुमारे २००० रुग्णांना मोफत वाटप माहेश्वरी सभेच्या वतीने तालुकाध्यक्ष उमेशकुमार जेथलिया व सर्व समाज बांधव यानी यशस्वी रित्या केले. मागील १९ वर्षांपासून हे वाटप कोजागिरी पौर्णिमेला होते.

तेलगाव येथील सुप्रसिद्ध आयुर्वेदचार्य स्व चंदूलालजी कलत्री याचे दमा या आजारवरील औषधचे वाटप मागील १९ वर्षांपासून माजलगाव तालुका माहेश्वरी सभेच्या वतीने कोजागिरी पौर्णिमेच्या दिवशी करण्यात येते यावर्षी कोजागिरी पौर्णिमा ६ ऑक्टोंबर सोमवार रोजी शहरातील राजस्थानी मंगल कार्यालय येथे रात्री १२वाजता कोजागिरीच्या दुधासोबत सुमारे २००० लोकांनी लाभ घेतला.

.यावेळी व्यासपीठावर तालुकाध्यक्ष उमेश जेथलिया माजी जिल्हाध्यक्ष जयप्रकाश कलंत्री, राधेश्याम लोहिया,राजेंद्र इंदानी संतोषबापू जेथलिया, रमेश बाहेती,तालुका सचिव गोपाल मानधने उपस्थित होते. यावेळी समाज प्रबोधन पर कार्यक्रम आयोजित केले होते विविध भजनाचा कार्यक्रम यावेळी घेण्यात आला.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विनोद जाजू कमलकिशोर लड्डा यांनी तरं आभार नवल किशोर काबरा यांनी केले.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी माजलगाव माहेश्वरी सभेच्या पदाधिकारी जगदीश चंडक बाला प्रसाद भूतडा दिलीप रांधड, डॉ संजय जेथलिया, डॉ महेश मालपाणी रवी मानधने, रामदं झन्वर,विनोद बजाज,गणेश लोहिया, महेश मुंधडा, दिनेश मलानी, पंकज मालानी,राम भूतडा,नवनीत मुंधडा, आसाराम झंवर, गोविंद भंडारी, यांच्या सह माहेश्वरी सभेचे पदाधिकारी व शेकडो कार्यकर्त्यांनी परिश्रम केले.

# भारती कैलास शिंदे हिची बँक आफ इंडियात सीएसए पदावर निवड




आष्टी - (प्रतिनिधी) आष्टी तालुक्यातील पिंपळा येथील पिंपळेश्वर विद्यालयातील स्व. कैलास भानुदास शिंदे यांची कन्या सौ. भारती अजय ज-हाट - शिंदे हिने स्पर्धा परीक्षा देत आयबीपीएस या संस्थेमार्फत दिलेल्या बँकींग परीक्षेत सुयश मिळविले आहे.भारतीची बँक आफ इंडियात सीएसए पदावर निवड झाली आहे.

तिच्या या निवडीबद्दल माजी आ. भीमराव धोंडे, ह. भ. प. राऊत दादा महाराज, माजी पं. स. चे सदस्य संजय धायगुडे, म्हेत्रे जवान, कडा कृ. उ. बा. समितीचे संचालक रामदास शेंडगे, सरपंच सोन्याबापु भवर, बाबासाहेब भिटे, पांडुरंग गावडे, भीमराव माळशिखरे, मच्छिंद्रनाथ फणसे, चंद्रशेखर साके, बापुराव शिंदे, दवा गव्हाणे, आजिनाथ विधाते, संजयदादा विधाते, उध्दव विधाते, रावसाहेब भस्मे, हरिभाऊ शेंडगे, दादा विधाते, रामचंद्र लिंभोरे, विलास गवळी, चंद्रकांत शेंडगे, रोहिदास सोनवणे, डा. तात्या शेंडगे, अशोक भस्मे, कैलास सुंबे, आजिनाथ दिंडे, अशोक शेंडगे, विठ्ठल खटके, भीमराज ज-हाट, दादा खटके आदिंनी अभिनंदन केले.

भारतीचे वडील कैलास शिंदे सर हे कोरोना आजाराने चार वर्षापूर्वी निधन झाले आहे. त्यानंतर तीने जिद्द, चिकाटी व परिश्रम घेत हे यश प्राप्त केले. भारतीने हे यश मिळवुन ग्रामीण विद्यार्थीसमोर आदर्श निर्माण केला आहे. पिंपळा गावातील पहिली महिला बँक अधिकारी बणण्याचा तिने मान पटकावला आहे. भारती शिंदे ही ग्रामपंचायत अधिकारी उध्दव शिंदे यांची पुतणी आहे.

# करुणा सेवा ट्रस्टने दिला पूरग्रस्त भागातील कुटुंबाला मदतीचा हात



केज/प्रतिनिधी

मागील महिन्यापासून मराठवाड्यातील अनेक जिल्ह्यांत अतिवृष्टी सदृश्य पाऊस झाला त्यामुळे मराठवाड्यातील जन जीवन विस्कळीत झाले होते.पुराच्या पाण्याने शेती पिकांचे मोठे नुकसान झाले तर अनेकांच्या घरात पाणी शिरल्यामुळे नागरिक हतबल झाले होते त्यांना मदतीचा हात म्हणून मुंबई येथील करुणा सेवा ट्रस्ट यांच्या संकल्पनेतून उदय चांदाराना यांच्या सहकार्याने बीड धाराशिव जिल्ह्यातील पूरग्रस्त नागरिकांना मदतीचा हात देत जीवनावश्यक वस्तू व किराणा मालाचे वाटप करण्यात आले.

संकटात सापडलेल्या पूरग्रस्त भागातील कुटुंबांना आधार देण्याचे समाजभान राखत मुंबई येथील युवा उद्योजक प्रशांत भैय्या गाडे यांच्या माध्यमातून बीड धाराशिव जिल्ह्यातील पूरग्रस्त भागात ब्लँकेट,चादरी, अन्न धान्य,तेल,बिस्किटे, फरसाण,चटणी,व अन्य गृहउपयोगी वस्तू,औषधे, खाद्य पदार्थ वाटप करण्यात आले.यावेळी शिवप्रसाद ठोंबरे, अभिषेक भिसे,राहुल ठोंबरे,बप्पा भिसे,प्रदीप ठोंबरे,पोपट लांडगे, राजाभाऊ इटकर,शेळके अण्णा,आकाश भैय्या फरके,मारुती नवगण, पत्रकार दत्तात्रय मुजमुले यांच्यासह मित्र परिवार उपस्थित होता.

# विश्व निवेशक सप्ताह निमित्त एन.एस.ई.मार्फत योगेश्वरी तंत्रनिकेतन महाविद्यालयात गुंतवणूकदार जागृती कार्यक्रम संपन्न



अंबाजोगाई/प्रतिनिधी

विद्यार्थ्यांच्या आर्थिक साक्षरतेसाठी विश्व निवेशक सप्ताह निमित्त कृष्णाजी पुरुषोत्तम चौसाळकर योगेश्वरी तंत्रनिकेतन महाविद्यालय महाविद्यालयात उपक्रम राबविण्यात आला. विद्यार्थी सुशिक्षित होतात मात्र प्रत्येक विद्यार्थी आर्थिक साक्षर असेलच असे नाही आर्थिक साक्षरता होणे काळाची गरज आहे,आपला पैसा कुठे व कसा गुंतवायचा, पैसे कसे कमवायचे, आलेल्या पैशाचे नियोजन कसे करायचे याचे ज्ञान विद्यार्थी दशेत मिळाले तर भविष्यामध्ये तो विद्यार्थी कधीच आर्थिकअडचणीत येणार नाही,यासाठी संस्थेचे अध्यक्ष श्री. चंद्रशेखर बर्दापूरकर, उपाध्यक्ष श्री.गणपत व्यास,का.उपाध्यक्ष ड जगदीश चौसाळकर, सचिव श्री.कमलाकरराव चौसाळकर यांनी कार्यक्रमाचे आयोजन केले. योगेश्वरी पॉलिटेक्निकचे प्राचार्य रमण देशपांडे यांच्या नेतृत्वाखाली योगेश्वरी पॉलिटेक्निक मध्ये भारत सरकारच्या भारतीय प्रतिभूती व विनिमय बोर्ड (सेबी) व नॅशनल स्टॉक एक्सचेंज (एन एस इ) अंतर्गत योगेश्वरी पॉलिटेक्निक आंबेजोगाई येथे पॉलिटेक्निकच्या विद्यार्थ्यांसाठी विश्व निवेशक सप्ताहाचे औचित्य साधून एक दिवशीय स्मार्ट निवेशक जागरूकता कार्यक्रम घेण्यात आला.अलीकडे तरुण वर्गांमध्ये आर्थिक साक्षरता व आर्थिक नियोजनाचा अभाव जाणून येतो.तरुणांचा कल दिवसेंदिवस चैनी वस्तू,मौजमजा,बर्थडे पार्टी अशा गोष्टींकडे होत चालला आहे तसेच फसवणूक करणाऱ्या योजना ज्यामध्ये कमी वेळेत अधिक परतावा देण्याचे अमिष दाखवून विद्यार्थ्यांची व सर्व सामान्यांची फसवणूक करताना आपणास पाहायला भेटत आहेत. यामुळे भविष्यात येणाऱ्या शैक्षणिक तसेच आर्थिक अडचणींना त्यांना सामोरे जावे लागते म्हणून विद्यार्थी दशेमध्ये योग्य ती आर्थिक नियोजन त्यांनी केले तर भविष्यातील येणाऱ्या आर्थिक संकट ते निश्चितपणे टाळू शकतात व आर्थिक दृष्ट्या ते श्रीमंत आणि समृद्ध नागरिक बनू शकतात,यासाठीच सेबी तसेच नॅशनल स्टॉक एक्सचेंज एन एस इ चे सेक्युरिटीज मार्केट ट्रेनर श्री.गणेश चौधरी यांनी विद्यार्थ्यांना आर्थिक नियोजनाचे मार्गदर्शन केले.या कार्यक्रमात त्यांनी विद्यार्थ्यांना बचत व गुंतवणूक याचे महत्त्व व फरक समजावून सांगितला.बँक व पोस्ट ऑफिस मध्ये असलेल्या बचतीच्या विविध योजना समजावून सांगितल्या, आर्थिक नियोजनाचे सात टप्पे समजावून सांगितले तसेच कॅपिटल मार्केट काय असते? म्युच्युअल फंड व त्याचे वेगवेगळे फायदे,इत्यादी बद्दल सखोल अशी मार्गदर्शन करून सेबीची वेब साईड व टोल फ्री नंबर देऊन भविष्यात फसव्या योजनांपासून सजग राहण्याच्या सूचना दिल्या.हा कार्यक्रम यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी कॉलेज चे विभाग प्रमुख प्रा.आर. पी.कदम सर व प्रा.ए.एच. फड सर यांनी प्रयत्न केले तसेच सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन प्राध्यापक प्रकाश घुंबरे सर यांनी केले



# आद्या कवि महर्षी वाल्मिकी यांची जयंती वडवणीत साजरी

वडवणी (प्रतिनीधी)

प्रतिवर्षी प्रमाणे महर्षी वाल्मिकी ऋषि यांच्या जयंतीनिमित्त वडवणी शहरामध्ये विविध कर्यक्रमाचे आयोजन आदीवासी महादेव कोळी समाजाच्या वतीने करण्यात आले होते. देशातील महान संत म्हणून व देशातील लोकांना रामायणाच्या माध्यमातून धार्मिक अधिष्ठान मिळून मिळून देण्याचे काम त्यांनी केले आहे.परंतु

आज ही महर्षी वाल्मिकी समाजाचे विविध प्रश्न त्याचा न्याय समाजाला मिळत नाही संघर्षाची वेळ समाजावर आली आहे. सरकारने आमचे प्रश्न तात्काळ सोडले पाहिजेत व घटनेचे कलम ३४०,३४१,३४२ हे कलमे कायम ठेवून गावा गावात निर्माण झालेले वाद प्रेमाने संपुष्टात आणण्यासाठी सर्व समाजाने एकत्र येऊन चांगला संदेश दिला पाहिजे देश एकसंघ झाला पाहिजे आशा भावना व्यक्त करण्यात आल्या .

समाजाने आपल्या प्रश्नासाठी आंदोलन करण्यासाठी तयार राहिले पाहिजे. असे मत मान्यवरांनी व्यक्त केले यावेळी महादेव कोळी समाजाचे नेते दत्तात्रय माने पाटील,ओबीसी समाजाचे नेते प्रा.वैजेनाथ शिंदे,परीट समाजाचे युवा नेते संघर्ष राऊत,कृष्णा जाधव, भैय्यासाहेब माने,भरत माने,नंदकिशोर देवकुळे,तात्या माने,सोमनाथ पाटस्कर,अजित जाधव,हनुमंत लोकरे,तात्या झेंडे,

# ब्रम्हनाथ येळंब व निमगाव मायंबा बंधाऱ्यांचे रुपांतरण कामास प्रशासकीय मान्यता

## आ. सुरेश धस यांच्या भगीरथ प्रयत्नांना यश
## शेतकऱ्यांसाठी नवसंजीवनी; सिंचन व्यवस्थेत नवा टप्पा

मानूर प्रतिनिधी ह्व

शिरूर (कासार) तालुक्यातील जलसंपदा विकासासाठीचा अत्यंत महत्त्वाचा टप्पा पार पडला आहे. दीर्घकाळ प्रलंबित असलेले ब्रम्हनाथ येळंब व निमगाव मायंबा को. प. बंधाऱ्यांचे बॅरेज रुपांतरण काम अखेर आ. सुरेश धस यांच्या सातत्यपूर्ण व भगीरथ प्रयत्नांना यश येत महाराष्ट्र शासनाने प्रशासकीय मान्यता दिली आहे.

या मान्यतेनंतर तालुक्यातील जलसंपदा विकासाच्या दिशेने एक मोठे पाऊल उचलले गेले असून, शेतकऱ्यांसाठी ही जलसिंचनातील नवसंजीवनीठरणार आहे.

ब्रम्हनाथ येळंब बंधाऱ्याच्या रुपांतरणासाठी १७,३०,१२,६०६/ - (सतरा कोटी तीस लाख बारा हजार सहाशे सहा रुपये) इतका निधी मंजूर झाला आहे, तर निमगाव मायंबा बंधाऱ्याच्या रुपांतरणासाठी २२,०८,९५,१५६/- (बावीस कोटी आठ लाख पंच्याण्णव हजार एकशे छप्पन्न रुपये) एवढ्या खर्चाच्या प्रस्तावास शासनाने प्रशासकीय मान्यता दिली आहे.

या निर्णयानंतर लवकरच या दोन्ही ठिकाणी प्रत्यक्ष कामांना सुरूवात होणार आहे. प्रकल्पांतर्गत बंधाऱ्यांचे मजबुतीकरण, गेट्सची



दुरुस्ती, नवीन बॅरेज बांधकाम, जलसाठा क्षमता वाढविणे आणि जलप्रवाह नियंत्रण यांसारखी महत्त्वाची कामे केली जाणार आहेत. परिणामी परिसरातील शेकडो हेक्टर शेतीला थेट सिंचनाचा लाभ मिळून शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळणार आहे.या निर्णयामुळे शिरूर (कासार) परिसरातील जलसंपदा व्यवस्थापनात आमूलाग्र सुधारणा होईल. उन्हाळ्यातील पाण्याची टंचाई कमी होऊन पिकांचे उत्पादन वाढेल, भूजल पातळी स्थिर राहील, तसेच जनावरांसाठी पाण्याची उपलब्धता सुधारेल.स्थानिक शेतकरी, ग्रामपंचायत प्रतिनिधी आणि नागरिकांनी या निर्णयाचे स्वागत करताना सांगितले की,हा निर्णय आमच्या शेतशिवाराच्या पुनरुत्थानाचा आणि जलसमृद्धीचा पाया ठरणार आहे.

या महत्त्वपूर्ण निर्णयाबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील,

# मनुरवाडी गावच्या ग्रामसेवकास निलंबीत करा गटविकास अधिका-यांकडे मागणी



माजलगाव /प्रतिनिधी: तालुक्यातील मनुरवाडी गावचे ग्रामसेवक यांनी गावातील तरूणांना शिवीगाळ केल्याप्रकरणी ग्रामसेवकावर कडक कारवाई करून निलंबन करा अशी मागणी गटविकास अधिकारी यांचेकडे ग्रामस्थांच्या वतीने निवेदनाव्दारे करण्यात आली.

दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, दि. ५ ऑक्टोबर रविवारी रात्री १२ वाजता गावातील मंदिरासमोर येत ग्रामसेवकाने रात्री बारा वाजता अतिषबाजी केली. याबाबत गावातील नागरिकांनी, तरूणांनी विचारणा केली असता मुकुंद पवार, गणेश जाधव, योगेश पवार या तरुणांसह ग्रामस्थांना शिवीगाळ केली. त्यामुळे अशा हुल्लडबाज ग्रामसेवकावर कडक कारवाई करा व पदावरून निलंबीत करावे अशी मागणी ग्रामस्थानी गटविकास अधिका-यांकडे निवेदनाव्दारे केली असुन निवेदनावर मुकुंद पवार, गणेश जाधव, योगेश पवार, ऋषिकेश शिंदे, कैलास शिंदे, विशाल पवार, नितीन थोरात, शहाजी पवार, गणेश थोरात, अमोल पवार, भिम थोरात, अतूल पवार, बापू श्रिखंडे, महेश शिंदे योगेश शिंदे, अनंता जगताप, भागवत हरकाळ, सुरेश ढगे यांच्या स्वाक्ष-या आहेत.

# सामान्य जनतेची सेवा करणारा शिवछत्र परिवार आहे -ह.भ.प.विशाल महाराज खोले

गेवराई (प्रतिनिधी) साधुसंत आणि सर्वसामान्य व गोरगरीब जनतेची सेवा करणारा हा शिवछत्र परिवार आहे. कीर्तन महोत्सवाला एवढी मोठी मंडळी गोळा होतात ही आदरणीय शिवाजीराव दादा पंडित यांची पुण्याई आहे. शिवाजीराव पंडित परिवाराने गेवराई तालुक्यामध्ये सामान्य जनतेसाठी निष्ठेने काम केले त्यामुळेच लोकांनी त्यांना भरभरून प्रेम दिले आहे असे प्रतिपादन ह. भ. प. विशाल महाराज खोले यांनी केले. शिवाजीराव (दादा) पंडित यांच्या अभिष्टचिंतन सोहळ्या निमित्ताने आयोजित किर्तन महोत्सवात ते बोलत होते, त्यांनी आपल्या गोड आवाजातून त्यांनी आवाजातून उपस्थितांना खिळवून ठेवले. यावेळी शिवाजीराव पंडित यांच्यासह अभिष्टचिंतन सोहळा समितीचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

गेवराई शहरातील शिवनगरीत माजी मंत्री शिवाजीराव (दादा) पंडित यांच्या ८८ व्या अभिष्टचिंतन सोहळ्या निमित्ताने आयोजित करण्यात आलेल्या श्रीमद् भागवत कथा आणि



कीर्तन सोहळ्यात किर्तनसेवेचे चौथे. पुष्प ह.भ.प. विशाल महाराज खोले यांनी गुंफले.

संत तुकाराम महाराज यांच्या क्षणभरी आम्ही सोशिले वाईट या विराणी भावस्वरूपातील अभंगावर निरूपण केले. यावेळी बोलताना ते म्हणाले की वारकरी संप्रदाय हा वैभवाचा संप्रदाय आहे. वारकरी विचारधारा अंगीकारून प्रत्येक व्यक्तीने वैभवात राहिले पाहिजे. प्रपंच असुदे परमार्थ आपण वैभवी जीवन जगले पाहिजे असे सांगून आरोग्य उत्तम ठेवा. मेंदू सतेज ठेवा. डोके शांत ठेवा तरच आपण आनंदी जीवन जगू असेही ते यावेळी म्हणाले. संत मुक्ताबाईच्या पालखी सोहळ्याच्या पावन स्पर्शाने या भागातली भूमी पुण्यवान झाली आहे. शिवछत्र परिवाराच्या माध्यमातून धर्माचे मोठे काम या भागात होते आहे. वारकरी जीवन जगणारा हा शिवछत्र परिवार आहे. आपल्या आडनावाला साजेशे वागणारा हा पंडित परिवार आहे. पंडित असूनही कीर्तनाला प्रत्यक्ष हजर राहतात हे शिवाजीराव दादांची मोठी श्रीमंती आहे असेही ते यावेळी म्हणाले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन माधव चाटे यांनी केले. यावेळी ह. भ. प .साखरे महाराज, रामेश्वर राऊत महाराज, ज्ञानेश्वर जाधव महाराज, बाबासाहेब राऊत, योगेश ठोसर संतोष वनवे, अंकुश काळे, नामदेव बेंद्रे गलधर महाराज, बळीराम यादव, लखन पाटील, तुकाराम भवर गायनाचार्य तुळशीराम आतकरे,मृदंगाचार्य शत्रुघ्न पठाडे, भरत पठाडे यांच्यासह शिवाजीराव पंडित अभिष्टचिंतन सोहळ्याचे सर्व पदाधिकारी व कार्यकर्ते आणि भाविक भक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# गांधी पीस फाउंडेशन नेपाळच्या वतीने डॉ. सुमंत गायकवाड यांना मानद डॉक्टरेट पदवी प्रदान

माजलगाव प्रतिनिधी: पुणे येथील पत्रकार भवनात ५ आक्टोबर २०२५ रोजी महात्मा ज्योतिबा फुले माध्यमिक विद्यालयातील सेवाज्येष्ठ शिक्षक सुमंत गायकवाड यांना गांधी पीस फाउंडेशन नेपाळ च्या वतीने मानद डॉक्टरेट पदवीने सन्मानित करण्यात आले

कार्यक्रमाच्या अध्यस्थानी चित्रपट महामंडळाचे अध्यक्ष मेघराज राजेभोसले होते तर सामाजिक कार्यकर्त्या ॲड. प्रणाली सूर्यवंशी, गांधी पीस फाउंडेशन चे डॉ. दिपक जाधव आणि फाउंडेशन चे पदाधिकारी यांची प्रमुख उपस्थिती होती. डॉ. सुमंत गायकवाड यांच्या शिक्षण क्षेत्रातील योगदानाची दखल घेऊन त्यांना गांधी पीस फाउंडेशन, नेपाळच्या वतीने मानद डॉक्टरेट पदवी देऊन सन्मानित करण्यात आले. लोकशाहीर डॉ. अण्णाभाऊ साठे जन्मशताब्दी वर्ष २०१९ ला रशिया मास्को येथे झालेल्या आंतरराष्ट्रीय परिषदेला ही गायकवाड उपस्थित राहिले होते सुमंत गायकवाड यांना मानद डॉक्टरेट पदवी मिळाल्याबद्दल त्यांचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.




पुणे येथील पत्रकार भवनात ५ आक्टोबर २०२५ रोजी महात्मा ज्योतिबा फुले माध्यमिक विद्यालयातील सेवाज्येष्ठ शिक्षक सुमंत गायकवाड यांना गांधी पीस फाउंडेशन नेपाळ च्या वतीने मानद डॉक्टरेट पदवीने सन्मानित करण्यात आले

# रूग्णांची हेळसांड थांबवा ; तात्काळ सीटी स्कॅन मशीन सुरू करा – टायगर ग्रुपची मागणी

अंबाजोगाई (प्रतिनिधी)

स्वामी रामानंद तीर्थ शासकीय वैद्यकीय रूग्णालय, अंबाजोगाई येथील सीटी स्कॅन मशीन हे मागील अनेक दिवसांपासून बंद आहे. त्यामुळे या रूग्णालयावर अवलंबून असलेल्या असंख्य गोरगरीब, वंचित, बहुजन व आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील रूग्णांची मोठ्या प्रमाणावर हेळसांड व खाजगी सीटी स्कॅन वाल्यांकडून आर्थिक लुट होत आहे. त्यामुळे तात्काळ सीटी स्कॅन मशीन सुरू करण्यात यावी अशी मागणी टायगर ग्रुपचे बीड जिल्हा संपर्कप्रमुख कोंडीराम पवार यांनी स्वामी रामानंद तीर्थ शासकीय वैद्यकीय रूग्णालयाचे अधिष्ठाता यांना टायगर ग्रुपच्या वतीने सोमवारी दिलेल्या निवेदनातून केली आहे.

टायगर ग्रुपचे राष्ट्रीय अध्यक्ष पै.डॉ.तानाजी भाऊ जाधव व मराठवाडा विभागीय अध्यक्ष गोरक्षक उमेश भैय्या पोखरकर यांच्या नेतृत्वाखाली टायगर ग्रुपचे बीड जिल्हा संपर्कप्रमुख कोंडीराम पवार यांनी स्वामी रामानंद तीर्थ शासकीय वैद्यकीय रूग्णालयाचे अधिष्ठाता यांना टायगर ग्रुपच्या वतीने सोमवार, दिनांक ६ ऑक्टोबर रोजी दिलेल्या निवेदनात नमूद केले आहे की, आपल्या स्वामी रामानंद तीर्थ शासकीय वैद्यकीय रूग्णालय, अंबाजोगाई येथील सीटी स्कॅन मशीन हे मागील अनेक दिवसांपासून बंद आहे.




त्यामुळे या रूग्णालयावर अवलंबून असलेल्या असंख्य गोरगरीब, वंचित, बहुजन व आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील रूग्णांची मोठ्या प्रमाणावर हेळसांड होत आहे. त्यामुळे तात्काळ सीटी स्कॅन मशीन सुरू करणे आवश्यक आहे. यामुळे परिसरातील रूग्णांना आवश्यक असलेल्या या वैद्यकीय सेवेपासून वंचित राहावे लागत आहे. सीटी स्कॅनची आवश्यकता असलेल्या रूग्णांना जवळच्या खाजगी सीटी स्कॅन वाल्यांकडे जावे लागत आहे, ज्यामुळे त्यांच्या उपचारात विलंब होत आहे, तसेच आर्थिक लुट आणि मोठ्या प्रमाणावर गैरसोय होत आहे. तरी आपण त्वरित या समस्येची दखल घेऊन सीटी स्कॅन मशीनची दुरूस्ती करावी किंवा रूग्णांच्या सोयीसाठी तातडीने पर्यायी व्यवस्था करावी, अशी विनंती ही करण्यात आली आहे. आम्ही केलेल्या मागणीनुसार तातडीने कारवाई व उपाययोजना झाली नाही तर टायगर ग्रुपच्या वतीने आपल्या स्वामी रामानंद तीर्थ शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रूग्णालय, अंबाजोगाई प्रशासनाविरोधात तीव्र आंदोलन करण्यात येईल याची आपण योग्य ती नोंद घ्यावी. असा इशारा ही निवेदनातून देण्यात आला आहे. निवेदन देते वेळी बीड जिल्हा संपर्कप्रमुख कोंडीराम पवार, तिरूपती राठोड, संतोष उजगरे, बालाजी शेवाळे, स्वप्नील कांडे, विजय शेवाळे, अकरम पठाण, दिपक लामतूरे, कृष्णा नरसिंगे, राया धारेकर, योगेश

# वडवणीचे समुद्र विज्ञान शास्त्रज्ञ डॉ.विलास फरताडे यांचा सत्कार संपन्न

## संशोधनासाठी दक्षिण चीन समुद्र महासागरशास्त्र संस्थेत निवड

वडवणी (प्रतिनिधी):- वडवणी येथील रहिवासी असणारे व सध्या गोवा राज्यामध्ये समुद्र विज्ञान संशोधन शास्त्रज्ञ म्हणून कार्यरत असलेले डॉ.विलास भागवत फरताडे यांना नुकतीच चीन सरकारच्या चायनीज अकॅडमी ऑफ सायन्सेस यांच्याकडून प्रतिष्ठित पोस्ट डॉक्टराल फेलोशिप मिळाली आहे. त्यांच्या पुढील संशोधनासाठी त्यांची दक्षिण चीन समुद्र महासागरशास्त्र संस्थेत निवड झाली आहे. आंतरराष्ट्रीय पातळीवर अशाप्रकारे सर्वोच्च यश गाठणारे डॉ.विलास फरताडे हे बीड जिल्ह्यातीलच नव्हे तर मराठवाड्यातील एकमेव असावेत. त्यांच्या या दैदिप्यमान कामगिरीबध्दल त्यांचा सोमवारी वडवणी येथे मित्र परिवाराच्या वतीने गौरव सत्कार करुन पुढील कार्यासाठी शुभेच्छा देण्यात आल्या.

याबाबत अधिक माहिती अशी की, डॉ.विलास फरताडे यांना नुकतीच गोव्याच्या सीएसआयआर नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ ओशनोग्राफी येथून



डॉक्टरेट पदवी प्रदान करण्यात आलेली आहे. दक्षिण चीन समुद्र महासागरशास्त्र संस्था ही आशियातील एक अग्रगण्य सागरी संशोधन संस्था आहे. येथे आधुनिक प्रयोगशाळा प्रवाळ संवर्धनासाठी प्रगत तंत्रज्ञान आणि बहुविषयक संशोधन सुविधा उपलब्ध आहेत. ही संस्था सागरी जीवनाचे संरक्षण व अभ्यास करण्यासाठी आंतरराष्ट्रीय पातळीवर ओळखली जाते. डॉ.विलास फरताडे यांचे संशोधन प्रवाळांच्या आरोग्यावर केंद्रित आहे. प्रवाळ हे किनाऱ्यांना नैसर्गिक संरक्षण देतात. वादळ आणि लाटांपासून त्यांना सुरक्षित ठेवतात. समुद्रातील हवामान संतुलित ठेवतात आणि माणसांच्या जीवनासाठी आवश्यक सागरी संसाधन टिकवतात. जर प्रवाळच नष्ट झाले तर पाणी, हवामान आणि माणसाच्या रोजच्या उपजीविकेवर यांचा गंभीर परिणाम हा होवू शकतो. आज हवामान बदल आणि प्रदूषण यासारख्या कारणांमुळे प्रवाळ हे नष्ट होण्याच्या मार्गावर आहेत. जो मानवी जीवनासाठी सर्वात मोठा धोकादायक इशारा आहे. डॉ.विलास फरताडे याच प्रवाळांवरील ताण लवकर ओळखण्यासाठी नविन पध्दत विकसीत करत आहेत. मागील अनेक काळापासून यावर त्यांचा सूक्ष्मपणे अभ्यास सुरु असून संशोधन केले जात आहे. या पध्दतीमुळे प्रवाळभित्ती वाचवण्यासाठी वेळेत उपाययोजना करता येतील आणि समुद्री परिसंस्था तसेच मानवी उपजीविका सुरक्षित राहतील. दरम्यान या प्रकल्पामुळे भारत-चीन दरम्यान सागरी विज्ञानातील संशोधनाला नवे बळ मिळणार असून प्रवाळ संवर्धनाच्या नवकल्पनांना जागतिक स्तरावर चालना मिळणार आहे. ही संपूर्ण महाराष्ट्रासाठी आणि भारत देशासाठी मोठी अभिमानाची बाब असणार आहे. डॉ.विलास फरताडे यांच्या या यशाबध्दल त्यांचे दि.६ ऑक्टोबर २०२५ सोमवार रोजी स्वस्तिक ज्वेलर्स याठिकाणी मित्र परिवार यांच्या वतीने गौरव सत्कार करण्यात आला. याप्रसंगी चंद्रकांत आप्पा जैन, भागवतराव फरताडे, अर्जुन जाधव, माने मामा, नितीन जैन, दिपक जैन, डॉ.शंकर वाघ, ज्ञानेश्वर वाव्हळ, शहादेव लोंढे, सचिन काटे, अशोक बहिरे, निलेश जैन, प्रा.ओमप्रकाश जाधव, संदिप शिंदे, विनोद गार्डी, वैजनाथ तोगे, तेजस सदरे, वसूवैभव जाधव, यांसह आदींनी अभिनंदन करुन त्यांना त्यांच्या पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या.

# खा.बजरंग सोनवणे मुंबई वरून आले अन् कपिलधारवाडीत गेले ; जमिनीला पडलेल्या भेगांची केली पाहणी

## स्थलांतरित ग्रामस्थांशी संवाद साधत दिला धीर तातडीने सर्वेक्षण करण्या बाबत तहसीलदार सोबत चर्चा

बीड/प्रतिनिधी

बीड तालुक्यातील पाली ग्रामपंचायत हद्दीतील कपिलधारवाडी परिसरात जमिनीतील भेगा व जमीन खचणे असे प्रकार घडल्याने नागरिक भयभीत आहेत.या गंभीर भूगर्भीय परिस्थितीवर तातडीने वैज्ञानिक भूगर्भ सर्वेक्षण करण्यात यावे, असे पत्र खा.बजरंग सोनवणे यांनी महा निदेशक,भारतीय भूगर्भ सर्वेक्षण (ऋडख),भारत सरकार,नवी दिल्ली यांना दिलेले आहे.दरम्यान दि.७ रोजी खा.बजरंग सोनवणे हे मुंबई वरून बीड जिल्ह्यात दाखल झाले. आल्या आल्या त्यांनी केजला न जाता कपिलधारवाडीत जात भेगांची पाहणी केली.

कपिलधारवाडी गाव व त्याच्या परिसरात (पाली ग्रामपंचायत) गेल्या काही दिवसांपासून अत्यंत गंभीर भूगर्भीय स्थिती निर्माण झालेली आहे. अलीकडच्या काही दिवसांत या परिसरात जमिनीत मोठ्या भेगा पडल्याचे दिसून आले असून त्या झपाट्याने वाढत आहेत.अनेक



ठिकाणी जमीन खचल्याचेही स्पष्ट दिसते. त्यामुळे परिस्थिती अत्यंत गंभीर बनली असून स्थानिक नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.शेतजमिनी, घरे,सार्वजनिक रस्ते इत्यादींना संभाव्य धोका निर्माण झाला आहे. या घडामोडींच्या स्वरूपा वरून हे स्पष्ट होते की,या भागात अनपेक्षित व धोकादायक भूगर्भीय बदल होत आहेत.या परिस्थितीच्या गांभीर्याचा तातडीने विचार करून भारतीय भूगर्भ सर्वेक्षण विभागाने (ऋडख) केंद्रा तील तज्ञांची टीम तातडीने पाठवून कपिलधारवाडी परिसर व आजूबाजूच्या भागाचा सखोल भूगर्भीय व भू-तांत्रिक सर्वेक्षण करावे,असेपत्र खा.बजरंग सोनवणे यांनी संबंधित विभागाला दिले आहे. दरम्यान,खा.बजरंग सोनवणे विकासकामाच्या निमित्ताने दोन दिवस मुंबईत होते.ते मंगळवारी सायंकाळी बीड जिल्ह्यात दाखल झाले.जिल्ह्यात आल्यानंतर ते थेट कपिलधारवाडीत गेले. गावात पडलेल्या भेगा आणि पडझडीची पाहणी केली. त्याठिकाणी गावातील नागरिकांचे सुरक्षित स्थळी स्थलांतर केलेले असून त्याठिकाणी महिला भगिनीची भेट घेतली.ग्रामस्थांशी संवाद साधत त्याना धीर दिला. आपण उपाय योजना साठी पत्रव्यवहार करत आहोत.तुम्ही काळजी करू नका,मी तुमच्या सोबत आहे,असा विश्वासही दिला.यावेळी बीडचे तहसीलदार सोबत होते.

.भूगर्भ सर्वेक्षण विभागाकडे अशी मागणी

सर्वेक्षणाद्वारे भूस्खलन व भेगा पडण्यामागील शास्त्रीय कारणे शोधावीत व तात्काळ प्रतिबंधक व सुधारात्मक उपाय सुचवावेत.आवश्यक असल्यास पर्यावरण,वन व हवामान बदल मंत्रालय तसेच राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण (छऊच-) यांच्याशी समन्वय साधून बाधित क्षेत्रातील सुरक्षिततेची खात्री करावी आणि पुढील मानवी व पर्यावरणीय हानी टाळावी.या विषयाचे आपत्तीजन्य व तातडीचे स्वरूप लक्षात घेऊन या प्रकरणास प्राधान्य देऊन आपल्या प्रादेशिक तसेच केंद्रीय विभागांतून तातडीने कार्यवाही करावी असेही खा.बजरंग सोनवणे यांनी पत्रात म्हटले आहे.

# ढाळेवाडीच्या प्रितम हुलेची राज्यस्तरीय कुस्ती स्पर्धेसाठी निवड

पाटोदा (प्रतिनिधी) पाटोदा तालुक्यातील ढाळेवाडी येथील प्रीतम शामराव हुले हिने नुकतीच संभाजीनगर येथे आयोजित झालेल्या कुस्ती स्पर्धेत १४ वर्षाखालील ३६ किलो वजनी गटात विजय मिळवून राज्यस्तरीय निवडीस पात्र ठरली.प्रीतमच्या यशामागे सातत्यपूर्ण मेहनत, चिकाटी आणि कुस्तीतील कौशल्य आहे. स्पर्धेत तिने आपली ताकद, तंत्र, चपळाई आणि मानसिक सक्षमता सिद्ध केली. तिच्या या यशामुळे पाटोदा तालुक्यातील खेळ क्षेत्रात नवीन उत्साह निर्माण झाला आहे.संभाजी नगर येथे झालेल्या स्पर्धेत राज्यातील अनेक खेळाडू सहभागी झाले होते. प्रितमने आपले वर्चस्व कायम ठेवत आपल्या वजन गटातील सर्व प्रतिस्पर्ध्यांना पराभूत केले. प्रशिक्षकांनी तिच्या तयारीला, चिकाटीला आणि खेळातील शिस्तीला अभिनंदन केले आहे.सातत्यपूर्ण मेहनत आणि चिकाटीमुळे प्रितम विजेतेपद मिळवू शकली. स्थानिक खेळ मंडळ आणि कुटुंबीयांनी तिला पुढील राज्यस्तरीय स्पर्धांसाठी शुभेच्छा दिल्या. तिच्या यशामुळे पाटोदा तालुक्यातील मुलींमध्ये कुस्तीसारख्या खेळांमध्ये सहभाग वाढण्याची प्रेरणा मिळाली.प्रितम पुढील राज्यस्तरीय स्पर्धेत महाराष्ट्राचे प्रतिनिधित्व करेल



अशी सर्वांनी अपेक्षा व्यक्त केली आहे.प्रीतमच्या या यशामुळे स्थानिक खेळाडू, कुटुंबीय आणि नागरिक अत्यंत आनंदित आहेत. तिच्या मेहनतीने आणि चिकाटीने एक आदर्श तयार झाला आहे, ज्यातून इतर मुलींनाही खेळामध्ये सहभागी होण्याची प्रेरणा मिळाली आहे.अभिनंदन प्रितम! तुझ्या मेहनतीला आणि जिद्दीला सलाम! पुढील स्पर्धांमध्येही तु महाराष्ट्राचे नाव उज्ज्वल कराल अशी सर्वांनी अपेक्षा व्यक्त केली आहे.

# धनगर आरक्षणासाठी आत्महत्या

## मृतदेहसह धनगर समाजाचा गेवराई तहसिलसमोर ठिय्या

गेवराई (प्रतिनिधी) धनगर समाजाचा एसटी आरक्षणात समावेश करा या मागणीसाठी गेवराई शहरातील एका मजुराने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची दुर्देवी घटना (दि.०६) रोजी. सायं १० वाजता संतोष नगर मोंढा नाका भागात घडली. मयता ज्ञानदेव कोल्हे यांच्या खिश्यात चिठ्ठी आढळली असून धनगर समाजाला आरक्षण मिळत नसल्याने हे पाऊल उचलत असल्याचे त्यामध्ये नमुद केले आहे. दरम्यान सदरील घटनेनंतर संतप्त समाज बांधवांनी मृतदेह गेवराई तहसील कार्यालयासमोर आणून ठेवला. मृत्यूदेह सोबत समाजबांधवांनी तब्बल अर्धा तास ठिय्या आंदोलन केले.




तहसीलदारांनी निवेदन स्विकारल्यानंतर नातेवाईकांनी मृतदेह ताब्यात घेतला.व कोल्हे यांच्या परिवाराला शासनाकडून आर्थिक मदत देण्यासाठी प्रयत्न करु असे तहसिलदार खोमणे यांनी समाजाला अश्वासन दिले.

गेवराई शहरातील संतोष नगर मोंढा नाका भागातील ज्ञानदेव नामदेव कोल्हे (वय ४४) यांनी दि. ०६ सोमवार रोजी सायं १० वा सुमारास गळफास घेऊन आत्महत्या केली. कोल्हे यांच्या खिश्यामध्ये चिठ्ठी आढळून आली आहे. आत्महत्येची माहिती मिळताच पोलीसांनी मृतदेह उत्तरीय तपासणीसाठी गेवराई उपजिल्हा रूग्णालयात दाखल केला.

# माहेश्वरी सभेकडून हजारो रुग्णांना दम्याचे मोफत औषध वाटप

माजलगाव :

प्रतिवर्षी प्रमाणे यावर्षी ही दि ६ ऑक्टोंबर रोजी शहरतील राजस्थानी मंगल कार्यालय येथे प्रसिद्ध आयुर्वेदचार्य स्व चंदूलालजी कंलंत्री यांच्या दमा औषधीचे सुमारे २००० रुग्णांना मोफत वाटप माहेश्वरी सभेच्या वतीने तालुकाध्यक्ष उमेशकुमार जेथलिया व सर्व समाज बांधव यानी यशस्वी रित्या केले. मागील १९ वर्षांपासून हे वाटप कोजागिरी पौर्णिमेला होते.तेलगाव येथील सुप्रसिद्ध आयुर्वेदचार्य स्व चंदूलालजी कलत्री यांचे दमा या आजारवरील औषधचे वाटप मागील १९ वर्षांपासून माजलगाव तालुका माहेश्वरी सभेच्या वतीने कोजागिरी पौर्णिमेच्या दिवशी करण्यात येते यावर्षी कोजागिरी पौर्णिमा ६ ऑक्टोबर सोमवार रोजी शहरातील राजस्थानी मंगल कार्यालय येथे रात्री १२वाजता कोजागिरीच्या दुधासोबत सुमारे २००० लोकांनी लाभ घेतला.

.यावेळी व्यासपीठावर



तालुकाध्यक्ष उमेश जेथलिया माजी जिल्हाध्यक्ष जयप्रकाश कंलंत्री, राधेश्याम लोहिया,राजेंद्र इंदानी संतोषबापू जेथलिया, रमेश बाहेती,तालुका सचिव गोपाल मानधने उपस्थित होते. यावेळी समाज प्रबोधन पर कार्यक्रम आयोजित केले होते विविध भजनाचा कार्यक्रम यावेळी घेण्यात आला.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विनोद जाजू कमलकिशोर लड्डा यांनी तरं आभार नवल किशोर काबरा यांनी केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी माजलगाव माहेश्वरी सभेच्या पदाधिकारी जगदीश चंडक बाला प्रसाद भूतडा दिलीप रांधड, डॉ संजय जेथलिया, डॉ महेश मालपाणी रवी मानधने, रामदं झन्वर,विनोद बजाज,गणेश लोहिया, महेश मुंधडा, दिनेश मलानी, पंकज मालानी,राम भूतडा,नवनीत मुंधडा, आसाराम झंवर, गोविंद भंडारी, यांच्या सह माहेश्वरी सभेचे पदाधिकारी व शेकडो कार्यकर्त्यांनी परिश्रम केले.

# श्री संत गाडगेबाबा खाजगी शिक्षकांची पतसंस्था अध्यक्षपदी (चेअरमन) संतोष आगलावे यांची बिनविरोध निवड

देगलूर, प्रतिनिधी

देगलूर, रविवार दिनांक ५ ऑक्टोबर पतसंस्थेच्या बैठकीत सर्वानुमते चेअरमन पदी निवड करण्यात आली याप्रसंगी संचालक विठ्ठल रेड्डी , बालाजी शिंदे, शिरीष मानुरे,सागर उल्लेवार, उमाकांत पाटील, संजय इंगळे, वानखेडे सर हे उपस्थित होते.

यावेळी सूचक बालाजी शिंदे तर अनुमोदन शिरीष मानुरे यांनी दिले. तर प्राधिकृत अधिकारी म्हणून जी.एस.कुलकर्णी यांनी निवडीची प्रक्रिया चोख पार पाडली.या निवडीचे संत गाडगेबाबा शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष विठ्ठल रेड्डी साहेब, उपाध्यक्ष सदाशिवराव



देशमुख कावळगावकर, सचिव संग्रामप्पा मळगे गोजेगावकर साहेब, सहसचिव राजेश पाटील हाळीकर यांनी स्वागत व अभिनंदन केले. तसेच महात्मा बसवेश्वर विचार मंच देगलूर चे सर्व पदाधिकारी व सर्व आगलावे मित्रपरिवार यांनी अभिनंदन केले.

# उपजिल्हा रुग्णालय देगलूर येथे १५ रुग्णांवरती यशस्वी शस्त्रक्रिया संपन्न

आज दिनांक ७ ऑक्टोबर २०२५ रोजी माननीय जिल्हा शल्यचकित्सक डॉक्टर पेरके सर यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच माननीय वैद्यकीय वैद्यकीय अधीक्षक डॉक्टर नरेश देवणीकर यांच्या देखरेखीखालीउपजिल्हा रुग्णालय देगलूर येथे १५ रुग्णांवरती यशस्वी शस्त्रक्रिया करण्यात आल्या त्यामध्ये मेजर शस्त्रक्रियांपैकी दोन रुणांवरती सिझेरियन सेक्शन शस्त्रक्रिया करण्यात आल्या तसेच दोन रुग्णांवरती अपेंडिक्सच्या शस्त्रक्रिया करण्यात आल्या त्याचप्रमाणे सहा रुग्णांवरती स्त्री कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया करण्यात



आल्या , अशा एकूण दहा मेजर शस्त्रक्रिया करण्यात आल्या,उर्वरित शस्त्रक्रिया या शरीरातील विविध भागावरती छोट्या-मोठ्या गाठी अशा मायनर स्वरूपाच्या करण्यात आल्या ..सदर शस्त्रक्रियेसाठी जिल्हास्तरावरून शल्यचिकित्सक डॉक्टर आवटी सर तसेच बिलोली वैद्यकीय अधीक्षक डॉक्टर विजयकुमार मोरे सर यांनी सदरच्या शस्त्रक्रिया पार पाडल्या सदरच्या शिबिरासाठी भूलतज्ञ म्हणून डॉक्टर अनिल थडके सर डॉक्टर महेश पेटकर यांनी काम केले ओटी इनचार्ज मोमीन सिस्टर, बोईनवाड सिस्टर, जमील, गौतम तसेच उपजिल्हा रुग्णालयातील सर्व अधिकारी व कर्मचारी यांनी सदर शिबिर यशस्वी करण्यासाठी मेहनत घेतली... अशा प्रकारच्या शस्त्रक्रिया शिबिरांचे आयोजन उपजिल्हा रुग्णालय देगलूर येथे दर महिन्याच्या प्रत्येक मंगळवारी करण्यात येते तरीही

# शेतकरी व शेतमजुरांच्या न्यायहक्कासाठी देगलूर बंद यशस्वी

देगलूर : प्रतिनिधी

शेतकरी आणि शेतमजुरांच्या न्यायहक्कासाठी तसेच देगलूर शहरातील विविध प्रलंबित मागण्यांच्या समर्थनार्थ मागील सात दिवसांपासून आमरण उपोषण करणारे माजी नगरसेवक शेख मीरा मोहियोद्दीन शेख सालार यांनी आज अखेर आपले उपोषण मागे घेतले. उपजिल्हाधिकारी अनुप पाटील यांनी उपोषणकर्त्यांच्या प्रमुख मागण्या मान्य केल्यानंतर हे उपोषण संपुष्टात आले.

या उपोषणाच्या समर्थनार्थ ६ ऑक्टोबर रोजी देगलूर बंद व रास्ता रोको आंदोलनाचे आयोजन करण्यात आले होते. सकाळी अण्णाभाऊ साठे चौकात भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या वतीने मोठ्या संख्येने कार्यकर्ते, शेतकरी, शेतमजूर, व्यापारी आणि नागरिक उपस्थित होते. सकाळी दहा ते बारा या वेळेत रास्तारोको आंदोलन झाल्याने महामार्गावर वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या होत्या.आंदोलनादरम्यान काँग्रेस पक्षाचे जिल्हाध्यक्ष हणमंतराव पाटील बेटमोगरेकर, देगलूर शहर काँग्रेस अध्यक्ष मोगलाजी शिरशेटवार, तालुकाध्यक्षा श्वेता बसवराज पाटील, महिला काँग्रेस तालुकाध्यक्षा नंदाताई देशमुख, प्रा. शिकंदर देसाई तसेच इतर पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.शहरातील सर्व व्यापाऱ्यांनी स्वयंस्फूर्तीने बंदला प्रतिसाद दिला. या आंदोलनामुळे देगलूर बंद पूर्णतः यशस्वी ठरला.

# संकटाच्यावेळी शिवसेना शेतकऱ्याच्या पाठीशी खंबीरपणे उभी -संपर्कप्रमुख बबनराव थोरात

देगलूर, प्रतिनिधी

देगलूर -- मराठवाड्यात कधी नव्हे अशा भीषण ओला दुष्काळ पडला असुन या गंभीर दुष्काळात सरकार जरी शेतकऱ्यांना वाऱ्यावर सोडत असले तरी शिवसेना व शिवसेना पक्षप्रमुख उद्धव बाळासाहेब ठाकरे खंबीरपणे उभी आहे. व राहील त्यासाठीच कुंभकर्ण झोपेचं सोंग घेणाऱ्या , गेंड्याच्या कातडीचे महा भ्रष्ट फसवणूक सरकारला जागे करण्यासाठी दि.११ आक्टोबर रोजी संभाजीनगर येथील शिवसेनेच्या वतीने हंबरडा महा मोर्चा आयोजित करण्यात आला आहे या मोर्चात शेतकऱ्यांना मोठ्या संख्येने उपस्थितीत राहून शेतकऱ्यांचा आवाज बुलंद करावा असे आवाहन शिवसेना नांदेड जिल्हा संपर्कप्रमुख बबनराव थोरात यांनी देगलूर येथील देगलूर बिलोली विधानसभा मतदारसंघ पदाधिकारी आढावा व नियोजन बैठकीत बोलताना केले या बाबतीत अधिक माहिती अशी की शेतकरी बांधवांना हेक्टरी ५० हजार रुपये अनुदान,पिक कर्ज माफी,पिक विमा आदी न्याय मागण्यासाठी संभाजीनगर येथील शिवसेना पक्षप्रमुख माजी मुख्यमंत्री मा श्री



उद्धव बाळासाहेब ठाकरे यांच्या नेतृत्वाखाली माजी विरोधी पक्षनेते मराठवाडा संपर्कप्रमुख मा श्री अंबादास दानवे साहेब , नांदेड जिल्हा संपर्कप्रमुख मा श्री बबनराव थोरात साहेब यांच्या प्रमुख उपस्थितीत दि.११ ऑ क्टोबर रोजी हंबरडा महामोर्चा काढण्यात येणार आहे या मोर्चाचे नियोजन व आढावा बैठक देगलूर सिद्धेश्वर रेस्टॉरंट सभागृहात दि.७ ऑक्टोबर रोजी शिवसेना नांदेड जिल्हा संपर्कप्रमुख मा श्री बबनराव थोरात साहेब यांच्या प्रमुख मार्गदर्शनाखाली संपन्न झाली यावेळी सहसंपर्कप्रमुख मा श्री दयाल गिरी साहेब , जिल्हा संघटक मा श्री विजय मुंडकर , आदी सह देगलूर बिलोली विधानसभा मतदारसंघातील पदाधिकारी उपजिल्हाप्रमुख महेश पाटील, देगलूर शिवसेना तालुकाप्रमुख बालाजी पाटील इंगळे खुतमापुरकर,मतदारसंघ प्रमुख पांडुरंग पाटील थडके, बिलोली तालुका प्रमुख शिवकुमार बामणे सगरोळीकर, जिल्हा समन्वयक विपुल पटणे, माजी जिल्हा परिषद सदस्य नागनाथ वाडेकर,बिलोली तालुका संघटक हाणमंत पाटील, देगलूर शहर प्रमुख संजय जोशी,शहर प्रमुख रवि उल्लेवार, शिवसेना उपशहरप्रमुख बाबुराव मिनकीकर उपशहरप्रमुख मष्णाजी पैलावार, युवा सेना तालुका प्रमुख तथा शिवसेना सोशल मीडिया नेटवर्क प्रमुख भागवत पाटील सोमुरकर, शिवसेना शहर संघटक भगवान जाधव, देगलूर तालुका संघटक शांतेश्वर पाटील शेवाळकर, उपतालुकाप्रमुख मानाजी पाटील लोणे , उपतालुकाप्रमुख पुरुषोत्तम अन्सापुरे, उपतालुकाप्रमुख व्यंकट रेड्डी आलुरे, युवा सेना तालुका समन्वयक प्रविण इनामदार, युवा सेना पदाधिकारी राहुल सोनकांबळे, युवा सेना पदाधिकारी विनोद सोनकांबळे, युवा सेना उपशहरप्रमुख गणेश चप्पलवार, विभाग प्रमुख शंकर पाटील देवकत्ते, गंगाधर पाटील, तुकाराम महाराज निवळले, गंगाधर पुंज्यपवार, सुभाष खुनेवाड अल्पसंख्याक सेना तालुका प्रमुख युसुफ भाई मिस्त्री, अल्पसंख्याक सेना शहर प्रमुख सय्यद मिर भाई , बिलोलोलीचे शिवसेना पदाधिकारी सरपंच बोडके, युवा सेना उपतालुकाप्रमुख आनंद सुर्यवंशी भुतनहिप्परगेकर आदीसह देगलूर बिलोली विधानसभा मतदारसंघातील शिवसेना पदाधिकारी युवा सेना पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थितीत होते

# प्रमोद महाजन शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था व शासकीय तंत्र प्रशाला केंद्रात आज ८ ऑक्टोबर रोजी

## उद्योग– सरेखित आणि नवयुगीन अल्पकालीन व्यवसाय अभ्यासक्रमाचा शुभारंभ

अंबाजोगाई (प्रतिनिधी)

येथील प्रमोद महाजन शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था व शासकीय तंत्र प्रशाला केंद्र, अंबाजोगाई (जि.बीड) येथे आज बुधवार, दिनांक ८ ऑक्टोबर रोजी दुपारी ३.३० वाजता अल्पकालीन रोजगारक्षम कार्यक्रम (एसटीईपी) अंतर्गत उद्योग - सरेखित आणि नवयुगीन अल्पकालीन व्यवसाय अभ्यासक्रमाचा शुभारंभ देशाचे सन्माननीय पंतप्रधान श्री.नरेंद्रजी मोदी यांच्या हस्ते आभासी (डिजिटल माध्यम) पध्दतीने करण्यात येणार आहे.

यावेळी श्री.आचार्य देवव्रतजी (राज्यपाल, महाराष्ट्र राज्य.), देवेंद्रजी फडणवीस (मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य.), एकनाथराव शिंदे (उपमुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य.), अजितदादा पवार (उपमुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य तथा पालकमंत्री, बीड मंत्री.), मंगल प्रभात लोढा (मंत्री, कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता, महाराष्ट्र राज्य.), श्रीमती पंकजाताई मुंडे (मंत्री पर्यावरण व दुग्ध विकास, महाराष्ट्र राज्य.) यांची सन्माननीय उपस्थिती राहणार आहे. तर यावेळी मुख्य अतिथि म्हणून महादेव क्षिरसागर (विश्वकर्मा लाभार्थी) हे असून कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सौ.नमिताताई मुंदडा (विधानसभा सदस्य, केज) या असणार आहेत. तसेच प्रमुख उपस्थिती म्हणून खासदार सौ.रजनीताई पाटील (राज्यसभा सदस्य), खासदार बजरंगबप्पा सोनवणे (बीड लोकसभा), सतिशभाऊ चव्हाण (विधान परिषद सदस्य), विक्रमराव काळे (विधान परिषद सदस्य), प्रकाशदादा सोळंके (विधानसभा सदस्य, माजलगाव.), सुरेशअण्णा धस (विधानसभा सदस्य, आष्टी.), धनंजयभाऊ मुंडे (विधानसभा सदस्य, परळी वैजनाथ.), संदीपभैय्या क्षिरसागर (विधानसभा सदस्य, बीड.), विजयसिंह पंडीत (विधानसभा सदस्य, गेवराई.), विवेक जॉन्सन, भा.प्र.से. (जिल्हाधिकारी, बीड.), जितीन रहेमान भा.प्र.से. (मुख्यकार्यकारी अधिकारी, जि.प. बीड.), नवनीत कॉंवत भा.पो.से.(पोलिस अधिक्षक, बीड.), ए.बी.ठोंबरे (चेअरमन, आय.एम.सी.अंबाजोगाई.) लाभणार आहे. अशी माहिती देवून या कार्यक्रमाचा लाभ विद्यार्थी, पालक व नागरिकांनी घ्यावा असे आवाहन निमंत्रक डॉ.पी.डी.उखळीकर (जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी, बीड) आणि पी.टी.मुने (प्राचार्य /मुख्याध्यापक, शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था व शासकीय तंत्र प्रशाला केंद्र, अंबाजोगाई) यांनी दिली आहे.

श्री गुरु तेग बहादुर साहिब जी यांच्या ३५० व्या शहीदी गुरुपूरब आणि श्री गुरु गोविंद सिंघ जी महाराजांच्या ३५० व्या गुरुयाई गुरुपूरब निमित्त आलेल्या

# यात्रेचा तख्त सचखंड श्री हजुर साहिब येथे जोरदार स्वागत

नांदेड :- श्री गुरु तेग बहादूर साहिब जी यांच्या ३५० व्या शहीदी गुरुपूरब आणि श्री गुरु गोविंद सिंघ जी महाराज यांच्या ३५० व्या गुरुयाई गुरुपूरब निमित्त धर्म प्रचार समिती शिरोमणी गुरुद्वारा प्रबंधक समिती, श्री अमृतसर साहिब यांच्या सहकार्याने गुरुद्वारा श्री धोबडी साहिब, आसाम येथून विशेष यात्रा सुरू झाली. जी ०५ ऑक्टोबर रोजी रात्री ०८:०० वाजता बिदर-देगलूर मार्गे तख्त सचखंड श्री हजूर अबिचलनगर साहिब, नांदेड येथे पोहोचली. ज्यामध्ये श्री गुरु ग्रंथ साहिब जी महाराजांची पालखी आणि श्री गुरु गोविंद सिंघ जी महाराज यांच्या ऐतिहासिक प्राचीन शस्त्रांची पालखी सुशोभित करण्यात आली होती.

दि. ०६ ऑक्टोबर रोजी तख्त साहिब येथे भव्य गुरुमत समागम आयोजित करण्यात आला होता. ज्यामध्ये श्री हरमंदिर साहिब, श्री दरबार साहिब, अमृतसर साहिब आणि श्री हजुर साहिब नांदेड येथील हजुरी रागी आणि कथकारांनी रात्री ८ वाजल्यापासून अमृतमयी कीर्तन आणि गुरुमत विचार सादर केले. या कार्यक्रमाला मोठ्या संख्येने उपस्थित राहून हजुरी संगतने आपली भाव भक्ती व्यक्त केली.

या यात्रेच्या स्वागत आणि गुरुमत समागमाचे संपूर्ण नियोजन



गुरुद्वारा बोर्डाचे प्रशासक डॉ. स. विजय सतबीर सिंघ जी यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आले. यात्रेचे स्वागत करण्यासाठी विविध ठिकाणी स्वागत कमान, बॅनर आणि छबील (शरबतचे लंगर) लावण्यात आले होते. यात्रेचे स्वागत फुलांच्या वर्षावाने करण्यात आले आणि गुरु महाराजांचे घोडे, भजन मंडळी, गटका पार्टीसह नगर कीर्तनाच्या स्वरूपात यात्रा तख्त सचखंड श्री हजूर साहिब येथे पोहोचली. तख्त सचखंड श्री हजूर साहिब येथे पोहोचल्यानंतर, तख्त साहिबचे जत्थेदार संत बाबा कुलवंत सिंघ जी आणि समूह पंज प्यारे साहिबांनी यात्रेचे जोरदार स्वागत केले.ही यात्रा दि. ०७ ऑक्टोबर रोजी सकाळी ०९:०० वाजता तख्त साहिब येथून अरदास करून गुरुद्वारा गेट नं. ०१ - गुरुद्वारा चौरस्ता गुरुद्वारा लंगर साहिब गुरुद्वारा नगीना घाट साहिब गुरुद्वारा तप अस्थान साहिब - मल्टी पर्पज हायस्कूल - चिखलवाडी कॉर्नर श्री गुरु गोबिंद सिंघ जी संग्रहालय नमस्कार चौक गुरुद्वारा मालटेकरी साहिब येथून प्रस्थान या यात्रेचे प्रस्थान करण्यात आले. यात्रेच्या आगमना सारखेच प्रस्थानावेळीदेखील गुरुद्वारा बोर्डाचे अधिकारी, कर्मचारी व हजुरी साध संगत मोठ्या संख्येत उपस्थित होते.

# माहूर पंचायत समितीचे गेट टाळे बंद

## सर्व कर्मचाऱ्याकडून मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या आदेशाला लाल झेंडी

माहूर./प्रतिनिधी

मुख्य कार्यकारी अधिकारी. आगामी जिल्हा वार्षिक योजना बैठकीचे अनुषंगाने तयारी करण्यासाठी व अहवाल सादर करण्यासाठी तसेच तग-छढ कल्याण समितीचे नियोजित दौऱ्यांचे अनुषंगाने आस्थापने विषयी व योजना विषयी माहिती संकलित करणे जिल्हा परिषद नांदेड सामान्य प्रशासन विभाग जाक्रा/जिपना/साप्रवि/आस्था -१/३६९५/२०२५., दिनांक. ०३/१०/२०२५ च्या आदेशा नुसार दिनांक. ०४ ऑक्टोबर २०२५ व दिनांक ०५ ऑक्टोबर २०२५ रोजी पंचायत समिती चालू ठेवण्यासंदर्भातील आदेश होते त्या आदेशाचे उल्लंघन करत माहूर पंचायत समिती कार्यालय टाळे बंद ठेवण्यास सर्व अधिकारी व कर्मचारी अनुपस्थिती राहिल्या




बद्दल कार्यवाही करण्यासाठी मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या दालनात जाऊन मनसे जिल्हाध्यक्ष रवि राठोड यांनी निवेदन देऊन मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडून कारवाईचे तोंडी आश्वासन घेतले असून लवकरात लवकर सर्व दोषी वर शिस्तभंग केल्या प्रकरणी दोन दिवसाचे वेतन कपात करून दंडात्मक कार्यवाही करण्यात करण्यासाठी निवेदनासह पुरावा म्हणुन दिनांक ४ व ५ रोजी चे लोकेशन चित्रफित व फोटो सादर केली आहे.असे मनसेचे जिल्हाध्यक्ष रवि राठोड यांनी माध्यमांशी बोलताना सांगितले आहे.

# बिलोली तालुका काँग्रेस कमिटी आढावा बैठक संपन्न

नांदेड : - बिलोली तालुक्यातील पाचपिपळी येथे बिलोली तालुका काँग्रेस कमिटीच्या वतीने तालुक्यासह जिल्ह्यातील अतिवृष्टी संदर्भात दि.७ आँक्टोबर रोजी खा. रविंद्र चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली नांदेड जिल्हाधिकारी कार्यालया समोर आयोजित करण्यात आलेल्या धरणे आंदोलन व विविध विषया संदर्भात आयोजीत आढावा बैठक संपन्न झाली.

या आढावा बैठकीदरम्यान बिलोली तालुक्यासह नांदेड जिल्ह्यात गेल्या दोन महिन्यापासून सतत झालेल्या अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांच्या खरीप पिकाचे मोठ्या प्रमाणात झालेल्या नुसकानी संदर्भात शेतकऱ्यांना शासना कडुन भरीव आर्थिक मदत मिळावी यासाठी दि. ७ आँक्टोबर रोजी जिल्हाधिकारी कार्यालया समोर खासदार रवींद्र चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली धरणे आंदोलन करण्यात येणार असून या बरोबरच आगामी स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुका संदर्भात कार्यकर्त्यांशी विचार विनिमय करण्यासाठी बिलोली तालुका काँग्रेस कमिटीची आढावा बैठक पाचपिपळी येथे दिनांक ६ आँक्टोबर रोजी




आयोजित करण्यात आली होती सदर बैठकीत वरील विषयासह अन्य विषयावर सविस्तर चर्चा करण्यात आली. तसेच अनेक नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांना खा. रविंद्र चव्हाण व उपस्थित मान्यवरांच्या हस्ते नियुक्ती पत्र देण्यात आले. यावेळी जिल्हाअध्यक्ष तथा माजी आमदार हणमंतराव पाटील बेटमोगरेकर,माजी सभापती संजयआप्पा बेळगे प्रदेश सरचिटणीस केदार पाटील साळुंखे, काँग्रेसचे तालुका अध्यक्ष शिवाजी पाटील पाचपिंपळीकर, किसान सेलचे जिल्हाध्यक्ष माधव पाटील पवळे,गिरीधर पाटील, शंकर व्यकम, दिलीप पांढरे, वलियोदिन फारुखी,शेख मुक्त्यार, अमजत चाऊस, संतोष पा खतगावकर, संतोष पा फडसे, बळवंत कदम, श्रीनिवास शिंदे, संदीप कटारे, रामपुरे सर. याच्यासह काँग्रेस पक्षाचे अनेक ज्येष्ठ कार्यकर्ते युवा कार्यकर्ते पदाधिकारी मोठ्या संख्येनी उपस्थित होते.

# अतिवृष्टी बाधितांच्या मदतीसाठी काँग्रेसचे जिल्हाधिकारी कार्यालया समोर जोरदार धरणे आंदोलन

ओला दुष्काळ जाहीर करण्यासह हेक्टरी पन्नास हजार तातडीने देण्याची मागणी खा . रविंद्र चव्हाण यांची मागणी

नांदेड (प्रतिनिधी) - जिल्ह्यात अतिवृष्टीमुळे शेतीचे मोठ्या प्रमाणात प्रचंड नुकसान झाले आहे. मात्र पहाणीच्या पलीकडे कोणतीही मोठी मदत मिळत नाही. हेक्टरी तुटपुंजी मदत देऊन सरकार कडून शेतकऱ्यांची थट्टा केली जात आहे. तातडीने ओला दुष्काळ जाहीर करुन, हेक्टरी पन्नास हजार तात्काळ मदत करा, पंचनाम्यानुसार अधिकची भरीव मदत द्यावी, शहरी भागातील पुरग्रस्तांना पंचवीस हजार मदत द्यावी अन्यथा शेतकऱ्यांचा महामोर्चा घेऊन रस्त्यावर उतरू असा इशारा खा. रवींद्र चव्हाण यांनी सरकारला दिला आहे.

ऑगस्ट सप्टेंबर दरम्यान जिल्ह्यात अतिवृष्टी झाल्यामुळे शेतीचे प्रचंड नुकसान झालेले असताना पाहणीच्या पलीकडे काहीच मदत होत नसल्याने तातडीने ओला दुष्काळ जाहीर करून




हेक्टरी पन्नास हजार मदत द्यावी यासह इतर प्रमुख मागण्यांसाठी खा. रवींद्र चव्हाण यांच्या नेतृत्वात दक्षिण जिल्हाध्यक्ष तथा माजी आ. हणमंतराव पाटील बेटमोगरेकर, उत्तर जिल्हाध्यक्ष राजेश पावडे, महानगराध्यक्ष अब्दुल सत्तार यांच्या प्रमुख उपस्थितीत जिल्हाधिकारी कार्यालयापुढे शहर व जिल्हा काँग्रेस कमिटीच्या वतीने मंगळवार दि ७ रोजी जोरदार धरणे आंदोलन करण्यात आले. यावेळी खा. रवींद्र चव्हाण बोलत होते. यावेळी जिल्हाध्यक्ष तथा माजी आ. हणमंतराव पाटील बेटमोगरेकर, उत्तर जिल्हाध्यक्ष राजेश पावडे, महानगराध्यक्ष अब्दुल सत्तार, श्रावण रॅंपनवाड, डॉ. यशपाल भिंगे, मसुद खान, आनंद चव्हाण, जयश्री पावडे, संजय बेळगे, तिरुपती पाटील कोंढेकर, निवृत्ती कांबळे, गोविंदबाबा गोंड, सुनील वानखेडे, प्रताप देशमुख बारडकर, रामराम पाटील रावनगावकर, शिवाजी पाटील पाचपिपळेकर, शेर अली खान, बालाजी गाडे पाटील, अब्दुल गफार, रहिम खान, महेश देशमुख तरोडेकर, अजिज कुरेशी, मुन्ना अब्बास, बालाजी चव्हाण, श्रीनिवास मोरे, विठ्ठल पावडे, प्रल्हादराव ठगे, सतिश देशमुख तरोडेकर, कैलाश गोडसे, रमेश गोडबोले, सुरेश हटकर, सत्यपाल सावंत, बापूसाहेब पाटील, माधव पवळे, अतुल पेदेवाड, शंकर शिंदे, दिपकसिंग हुजुरिया, अंबादास रातोळे, गगन यादव, महेश मगर, संजय वाघमारे, डॉ.करुणा जमदाडे, राजन देशपांडे, रंगनाथ भूजबळ, इंजि. नसीम पठाण,

गणेश पाटील ढगे, महेश शिंदे, ज्योती कदम, अनिल कांबळे, प्रसेनजित वाघमारे, संदिपकुमार देशमुख, सुभाष किन्हाळकर, सुभाष लोणे, आदिनाथ चिंताकुटे, महेश शिंदे, शेख नईम, गौतम शिरसाट, शेख मुख्तार, गोविंद पाटील, गणेश पाटील, शेख लतिफ, नरोद्दीन शेख, एसपी कुंभारे, प्रकाश दिपके आदीसह इतर पदाधिकारी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# प्रा.उत्तमकुमार कांबळे यांचा वाढदिवस पूरग्रस्त विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य देऊन साजरा !

देगलूर /प्रतिनिधी

पूर परिस्थितीमुळे देगलूर भागातील शेतकऱ्यांच्या शेतीचे व घरांचे प्रचंड नुकसान झाले असून खरीप पिकाचे अक्षरशः चिखल झाल्याने शेतकरी हवालदिल झालेला आहे.तर दुसरीकडे शेतकऱ्यांच्या पाल्यांचे शैक्षणिक साहित्य पुरात वाहून गेल्याने विद्यार्थी शाळेला जाण्यापासून वंचित राहत होते. कारण त्यांना शैक्षणिक साहित्य घेऊन देण्यासाठी त्यांच्या पालकाकडे काहीच राहिलं नव्हतं. त्यांच्या संसाराची निसर्गाने अक्षरशः राख रांगोळी केली होती. जर विद्यार्थ्याकडे शैक्षणिक साहित्य नसेल तर विद्यार्थी शाळेला जाणार कसे ? हा मोठा प्रश्न शेतकऱ्यांपुढे उभा होता. विद्यार्थ्यांचे जर शिक्षण थांबले तर देशाची पुढची पिढी घडणार कशी ? हा प्रश्न मात्र प्रा. उत्तमकुमार कांबळे यांना भेडसावत होता. म्हणुन त्यांनी आपल्या वाढदिवसानिमित्त आवाढव्य व्यर्थ खर्च न करता हारतुरे व शालींना फाटा देत देगलूर तालुक्यातील आलूर येथील जि. प. कें. प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांना शालेय शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्याचा समाजसेवी निर्णय घेतला असून अखेर त्यांनी दि.६ ऑक्टोंबर रोजी विविध मान्यवरांच्या हस्ते १८० विद्यार्थ्यांना शैक्षणिक शालेय साहित्य किटचे वाटप करून एक आगळावेगळा वाढदिवस साजरा केला आहे. या वाढदिवसाची सर्वत्र गोड चर्चा होताना दिसून येत आहे.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षा म्हणून देगलूर तालुका काँग्रेस कमिटीच्या अध्यक्षा श्रीमती श्वेताताई बस्वराज पाटील होत्या तर यावेळी आलूरचे सरपंच श्रीमान राजेश्वर देशमुख, मार्केट कमिटीचे मा.सभापती श्रीमान मंगलसिंह देशमुख, मा.जि.प.सदस्य निवृतीदादा कांबळे, देगलूर, महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ.व्यंकटेश शेरीकर, श्रीमान




विष्णुकांत पाटील खांडेकर,केंद्रप्रमुख श्रीमान तलवाडे, मुख्तार पटेल हनेगावकर, पांडू पाटील सोमुरकर, मनोहर देगावकर, ईश्वर दंडेलवार, शंकर कोळणूरे, प्रकाश हाळदे,

विठू विघमारे,बसवंत जाधव, इत्यादी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते . सर्वप्रथम क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले,अहिल्याबाई होळकर,व छत्रपती शाहू महाराज, डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. उपस्थित अध्यक्ष व प्रमुख पाहुण्यांचे गुलाब पुष्प देवून स्वागत करण्यात आल्यानंतर

मान्यवरांच्या हस्ते विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याच्या किटचे वाटप करण्यात आले.

या प्रसंगी अध्यक्ष श्वेताताई पाटील यांनी या स्तुत्य उपक्रमाचे , मोठे कौतुक केले. असुन मंगलसिंह देशमुख यांनी मनोगतातून प्रा.उत्तमकुमार कांबळे सरांच्या सामाजिक बांधिलकीचा गौरव करून या शाळेतील विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य देवून प्रेरणा दिल्याबद्दल आभार मानले.या कार्यक्रमात विविध मान्यवर, पालक व शाळेतील सर्व शिक्षकांनी प्रा.उत्तमकुमार कांबळे सरांना पुष्प गुच्छ देवून वाढदिवस अभीष्टचिंतन करून वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या. तर दुसरीकडे कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सय्यद हबीब सर नंदुरकर यांनी केले. तर साखरे सर यांनी उपस्थितांचे आभार मानले. यावेळी विविध सामाजिक व राजकीय क्षेत्रातील मान्यवर शिक्षक पालक व विद्यार्थी मोठ्या प्रमाणावर उपस्थित होते.





मुंबई. शिवालय प्रतिष्ठानच्या अध्यक्ष सौ संध्याताई कल्याणकर यांच्या वाढदिवसानिमित्त माननीय शिवसेना मुख्य नेते उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची सदिच्छा भेट घेतली त्याप्रसंगी आमदार बालाजी कल्याणकर, आदी.छाया. करणसिंह बैस

# अतिवृष्टीचा नायगाव तालुक्यात पुन्हा तडाखा!

नायगाव प्रतिनिधी

नायगाव तालुक्यात ६ ऑक्टोबरच्या पहाटे झालेल्या मुसळधार पावसाने पुन्हा एकदा जनजीवन विस्कळीत केले. शेतकऱ्यांच्या आशा-आकांक्षा पाण्यात गेल्या असून उरलेसुरले सोयाबीन पिक सुद्धा आता मातीमोल झाले आहे. तालुक्यातील कुंटूर, नायगाव, बरबडा आणि नरसी या चार मंडळांमध्ये रात्री उशिरापर्यंत मुसळधार पाऊस झाला.

मागील दोन महिन्यांपासून सततच्या पावसाने शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असताना, काही दिवसांच्या उघडीनंतर शेतकऱ्यांनी पुन्हा



कापणीला सुरुवात केली होती. मात्र या मुसळधार पावसाने शेतात पाणी साचून सोयाबीनच्या शेतांचे तळ्यांचे रूपांतर झाले असून, काढलेले सोयाबीन चिखलात गाडले गेले आहे.तालुक्यात एकूण ७८.५० मिमी पाऊस नोंदवला गेला. यापैकी बरबडा मंडळात ९३.५० मिमी, नायगाव मंडळात ९६.५० मिमी, कुंटूर मंडळात ७५.५० मिमी, तर नरसी मंडळात ८८ मिमी इतका पाऊस झाला आहे.

दरम्यान, देगाव शिवारात अतिवृष्टीमुळे गणेश मल्लू बिस्मिल्ले या मेंढपाळाच्या मेंढ्यांवर नैसर्गिक आपत्तीचा कहर झाला. त्यांच्या पाच मेंढ्यांचा मृत्यू झाला असून पाच ते सहा मेंढ्या गंभीर जखमी झाल्या आहेत. या घटनेची माहिती मिळताच प्रहार जनशक्ती पक्षाचे नेते गजानन शंकरराव पाटील चव्हाण यांनी तत्काळ घटनास्थळी भेट देऊन तहसीलदार आणि पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांना माहिती दिली.देगाव सज्जाचे तलाठी शिवकुमार मंगनाळे यांनी घटनास्थळी पंचनामा केला, तर पशुवैद्यकीय अधिकारी डॉ. बाळासाहेब ठाकरे यांनी मृत मेंढ्यांचे पोस्टमॉर्टेम करून अहवाल संबंधित विभागाकडे पाठविला.यापूर्वी ऑगस्ट महिन्यातील अतिवृष्टीतही नायगाव तालुक्यात एका नागरिकाचा बळी गेला होता. सततच्या पावसामुळे पूरग्रस्त नैसर्गिक आपत्तींमुळे शेतकरी हवालदिल झाला आहे तर पशुपालक बेदखल आणि शेतमजूर कामाविना भटकंती करत आहे सरकारकडून मदतीचा ठोस निर्णय न घेतल्याने नागरिकांमध्ये असंतोष असून अनेक प्रश्न उपस्थित केले जात आहे -

# संत डॉ.रामराव बापू महाराज यांच्या पाचव्या पुण्यतिथी निमित्त अभिवादन

माहूर /प्रतिनिधी

पोहरादेवी तीर्थक्षेत्राचे जगभरातील बंजारा समाजाचे आराध्य दैवत राष्ट्रसंत महान तपस्वी अखंड बाल ब्रह्मचारी गोर बंजारा समाजाचे धर्मपिठाधिश्वर पुज्यनीय डॉ.रामराव महाराज यांच्या पाचव्या पुण्यस्मरण दिनानिमित्त भावपुर्ण विनम्र अभिवादन.मठाधिपती परमपूज्य संत डॉ.रामराव बापू महाराज यांच्या पुण्यतिथीनिमित्त बंजारा भजनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते यामध्ये गाव भंडारा यांचा समावेश केला होता.

पोहरादेवी येथील संत सेवालाल महाराज यांच्या गादीवर विराजमान होते.

संत रामराव बापू महाराजांची पुण्यतिथी दिनांक ६ ऑक्टोबर २०२५ रोजी साजरी केली असून बंजारा समाजाचे धर्मगुरू असलेल्या संत डॉ.रामराव बापू महाराजांना पुण्यतिथीनिमित्त बंजारा समाजबांधव कडून

सर्व समाजाचे राजकीय नेते आणि समाजप्रबोधन करणारे मानतात,संत रामराव बापु

त्यांनी आयुष्यभर समाजातील अनिष्ट रूढी, अंधश्रद्धा आणि बालविवाह यांसारख्या प्रथे विरुद्ध समाजप्रबोधन केले.

यावेळी ईवळेश्वर येथील नाईक रवि जाधव, कारभारी



बंजारा समाजाचे धर्मगुरू
परमपुज्य डॉ.रामराव बापु महाराज

नारायण राठोड, पोलीस पाटील अतिष राठोड,बदु राठोड, नारायण चव्हाण,बंडू राठोड,परसराम जाधव,विनोद जाधव आणि गावकऱ्यांच्या वतीने प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून श्रद्धांजली वाहण्यात आली.